# महाराष्ट्र विधानसभा

**तिसरे अधिवेशन, २०२४**

---

**अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी**

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

**कल्याण -अंबरनाथ- बदलापूर राज्य महामार्ग क्र. ७६ उल्हासनगर हद्दी पर्यंतच्या रस्त्याच्या बांधकामाबाबत**

**(१) ३९९१० (३०-०३-२०२२). श्री.कुमार आयलानी (उल्हासनगर), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.किसन कथोरे (मुरबाड) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उल्हासनगर शहरातून कल्याण अंबरनाथ बदलापूर (राज्य महामार्ग क्र ७६) जात असून या मधील उल्हासनगर हद्दीमधील रस्ता अत्यंत खराब झाला असून हा रस्ता ३५ वर्षांपूर्वी बांधण्यात आलेला असून या रस्त्याच्या पुनर्निर्माणाकरिता आवश्यक असलेला प्रस्ताव तयार करून या रस्त्याकरिता सुमारे ८० कोटी रुपये निधी मंजूर करावा अशी मागणी लोकप्रतिनिधी यांनी मुख्यमंत्री, सार्वजनिक बांधकाम मंत्री आणि वित्त व नियोजन मंत्री यांच्या कडे केली आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर सार्वजनिक बांधकाम मंत्री यांनी आपल्या दिनांक ३० जून, २०२१ रोजीच्या पत्रानुसार लोकप्रतिनिधीनी निधीची उपलब्धता विचारात घेता, सदरचे काम प्राधान्यक्रम मंजुरी निकष व निधीच्या अधीन राहून हाती घेण्यात येणार असल्याचे कळविले आहे हे ही खरे आहे का,

(३) असल्यास, सदर रस्ता ३५ वर्षांपूर्वी बांधण्यात आलेला असल्याने त्याची कालमर्यादा संपली असल्याचे व तसेच रस्त्यावरुन अवजड वाहने जात असून वाहनधारकांना अनेक अडचणीना सामोरे जावे लागल्याचे निदर्शनास आले आहे हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, कल्याण-अंबरनाथ-बदलापूर रस्ता (राज्य महामार्ग क्र ७६) उल्हासनगर हद्दीपर्यंतचा रस्ता बनविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय ?

**श्री. रविंद्र चव्हाण (२४-०६-२०२४) :** (१) होय.

(२) होय.

(३), (४) व (५) अंबरनाथ, उल्हासनगर रस्ता (राज्य महामार्ग क्र.७६) उल्हासनगर हद्दीपर्यंत रस्ता बनविण्याकरीता एकूण रुपये ६८.०० कोटी मंजूर करण्यात आले आहे. सदर कामांची निविदा प्रक्रिया पूर्ण करण्यात आली असून कामे लवकरच सुरु करण्यात येत आहेत.

---

**थोर पुरूषांची चरित्रसाधने प्रकाशित करण्याबाबत**

**(२) ४१८७१ (०९-०४-२०२२). डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महात्मा ज्योतीबा फुले, छत्रपती शाहू महाराज आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे चरित्र, भाषणे, लिखाण व अप्रकाशीत साहित्य प्रकाशित करणे तसेच प्रकाशित साहित्याच्या प्रती छापणे तसेच इंग्रजी साहित्यांचे मराठीत भाषांतर करणे याबाबतची मागणी फुले, शाहू, आंबेडकर, रायटिंग अण्ड स्पीचेस प्रचार, प्रसार व संवर्धन समिती, जि.पुणे यांनी दिनांक ०७ फेब्रुवारी, २०२० व दिनांक १८ ऑगस्ट, २०२० रोजी मा.मुख्यमंत्री यांच्याकडे निवेदनाव्दारे केली आहे, हे

खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू म.फुले, छत्रपती शाहू महाराज, डॉ.बाबासाहेब आंबेडकर समितीने निवेदनात केलेल्या मागण्या व त्यावरील उपाय सुचविले आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, मागणीच्या अनुषंगाने याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत (दादा) पाटील (१३-०६-२०२४) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) व (३) महात्मा ज्योतीबा फुले, छत्रपती शाहू महाराज आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर या थोर पुरषांची चरित्र साधने प्रकाशित करण्यासाठी अनुक्रमे शासन निर्णय दि. ८.१.२०२१, दि. २०.४.२०२२ व दि. ३०.३.२०२१ अन्वये चरित्र साधने प्रकाशन समित्यांचे पुर्नगठन करण्यात आले असून या समित्यांमार्फत चरित्र साधने प्रकाशित करणे, प्रकाशित साहित्यांच्या प्रती छापणे, जतन करणे व भाषांतर करणे इ. कामकाज करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**कसारा – माळशेज घाट जोड रस्त्याच्या बांधकामाबाबत**

**(३) ५०७४८ (१८-०१-२०२३). श्री.दौलत दरोडा (शहापूर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कसारा – माळशेज घाट नियोजित जोड रस्त्याचे सर्वेक्षण करुनही रस्त्याच्या बांधकामाबाबत कोणतीही कार्यवाही करण्यात आली नसल्याचे माहे ऑक्टोबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, प्रस्तुत रस्त्याच्या बांधकामाबाबत शासनस्तरावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण (२१-०६-२०२४) :** (१) कसारा-माळशेज नवीन रस्त्याचे काम सद्य:स्थितीत शासन स्तरावर विचाराधीन नाही.
(२) व (३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**शासकीय अध्यापक विद्यालय, नेकनूर, (ता.जि. बीड) येथे अत्यधुनिक "राजीव गांधी विज्ञान व तंत्रज्ञान पार्क" स्थापन करणेबाबत**

**(४) ५८९७९ (२४-०४-२०२३). श्रीमती नमिता मुंदडा (केज) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शासकीय अध्यापक विद्यालय नेकनूर (ता. जि. बीड) येथे अध्यापक विद्यालयाच्या नावे असलेल्या साडेपाच एकर जागे पैकी साडेचार एकर जागा उपलब्ध आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, प्रत्येक महसुली मुख्यालयाच्या जिल्ह्यामध्ये अत्याधुनिक "राजीव गांधी विज्ञान व तंत्रज्ञान पार्क" स्थापन करण्याचा निर्णय शासनाने घेतला हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शासकीय अध्यापक विद्यालय नेकनूर, येथील जागा शिक्षण खात्याच्या स्वत:च्या मालकीची व जिल्ह्याच्या मध्यभागी असल्यामुळे सदर ठिकाणी "राजीव गांधी विज्ञान व तंत्रज्ञान पार्क" स्थापन करण्याबाबतचा प्रस्ताव तयार करून मंजुरी देण्याबाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी प्रधान सचिव, शालेय शिक्षण विभाग, मुंबई यांचेकडे दिनांक २५ जुलै,२०२२ रोजी वा त्यासुमारास निवेदनाद्वारे केली होती, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिपक केसरकर (२४-०६-२०२४) :** (१) हे खरे आहे.
(२) मा. उप मुख्यमंत्री तथा वित्त मंत्री यांनी २०२१-२२ च्या अर्थसंकल्पीय भाषणात प्रत्येक महसूली मुख्यालयाच्या जिल्ह्यामध्ये अत्याधुनिक "राजीव गांधी विज्ञान व तंत्रज्ञान पार्क" स्थापन करण्याची घोषणा केली आहे.
(३) याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी आयुक्त (शिक्षण) पुणे यांचेकडे दिनांक २५ जुलै,२०२२ रोजी निवेदनाद्वारे मागणी केली होती.
(४) महसूली मुख्यालय असलेल्या जिल्ह्यामध्ये अत्याधुनिक "राजीव गांधी विज्ञान व तंत्रज्ञान पार्क" स्थापन करण्याची घोषणा आहे. त्यामुळे इतर जिल्ह्यातील प्राप्त प्रस्तावांवर निर्णय झालेला नाही.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**अकरावी इयत्तेच्या राज्यशास्त्र व समाजशास्त्र विषयाच्या पाठयपुस्तकातून काही भाग वगळल्याबाबत**

**(५) ६५७६३ (२९-०८-२०२३). श्री.चेतन तुपे (हडपसर) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नॅशनल कौन्सिल ऑफ एज्युकेशन रिसर्च ॲण्ड ट्रेनिंगने (एनसीईआयटी) इयत्ता अकरावीच्या राज्यशास्त्र विषयाच्या "संविधान-का आणि कसे" या पाठयपुस्तकातून देशाचे पहिले शिक्षण मंत्री (मौलाना अब्दुल कलाम आझाद) यांचे संदर्भ काढून जम्मू-काश्मिर विलिनिकरणाचे संदर्भ व काही वाक्ये काढल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) तसेच, समाजशास्त्र विषयाच्या पाठयपुस्तकातून विदर्भातील पाणी प्रश्न, देशातील प्रदूषण तसेच पोलीस अत्याचाराबाबतचे व अन्य विषय वगळण्यात आले असल्याचेही दिनांक ९ एप्रिल,२०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, अभ्यासक्रमातून सदर विषय संदर्भ अथवा वाक्यांमधील बदल इ. करण्याची कारणे काय आहेत,
(४) असल्यास, वगळण्यात आलेल्या सदर बाबीं पूर्ववत अभ्यासक्रमात समाविष्ट करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिपक केसरकर (२४-०६-२०२४) :** (१) सदर बाब ही नॅशनल कौन्सिल ऑफ एज्युकेशनल रिसर्च अँड ट्रेनिंग (NCERT) नवी दिल्ली यांच्याशी संबंधीत आहे. सदर संस्था ही राष्ट्रीय पातळीवर अभ्यासक्रम व पाठ्यपुस्तके तयार करणारी संस्था आहे. सदर संस्था ही केंद्रशासनाच्या अधिपत्याखाली काम करते. त्यामुळे सदर बाब ही केंद्रशासनाच्या अखत्यारीतीत येते.
(२) हे खरे नाही.
महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळाच्या इयत्ता अकरावीच्या अथवा बारावीच्या अभ्यासक्रमातून व समाजशास्त्र विषयाच्या पाठयपुस्तकांतून पुस्तक प्रकाशित केल्यापासून कोणताही भाग वगळण्यात आलेला नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यात बांधकाम साहित्यांचे भाव वाढल्याबाबत**

**(६) ६६६७४ (०१-०९-२०२३). श्री.संजय रायमुलकर (मेहकर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात बांधकाम साहित्यांचे भाव वाढल्याने गरजू व सर्वसाामन्यांच्या घर बांधणी खर्चावर परिणाम होत असल्याने सामान्य जनतेचे हाल होत असल्याची बाब माहे मे, २०२३ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, घर बांधणीकरिता वाळू , खडी, सिमेंट व स्टीलचे भाव स्थिर ठेवण्याकरिता शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण (०६-०६-२०२४) :** (१) या विभागातील दस्तऐवजानुसार असे आढळून आले नाही.
(२) भाव स्थिर ठेवण्याच्या उपाययोजना हया विभागाच्या थेट कार्यकक्षेत येत नाही.
सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत करण्यात येणाऱ्या कामांसाठी वेळोवेळी दरसूची प्रकाशित करण्यात येते व त्यानुसार पुढील कार्यवाही करण्यात येते.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही

---

**परभणी येथील प्रशासकीय इमारतीच्या दुसऱ्या मजल्यावरील छत कोसळल्याबाबत**

**(७) ६६८४७ (२३-०८-२०२३). डॉ.राहूल पाटील (परभणी) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) परभणी येथील प्रशासकीय इमारतीच्या दुसऱ्या मजल्यावरील छत कोसळयाचे दिनांक १८ एप्रिल, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले,
(२) असल्यास, सदर प्रशासकीय इमारतीची दुरवस्था झाली असून दरवर्षी इमारतीच्या दुरुस्तीसाठी मोठी तरतूद केली जात असतांनाही इमारतीच्या दुरुस्तीचे काम केले जात नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त अशा घटना वारंवार होत असल्यामुळे कार्यालयातील कर्मचारी व नागरीकांच्या जिवितास धोका निर्माण झालेला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदरहू प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीमध्ये काय आढळून आले तद् नुषंगाने भविष्यात अशा प्रकारे जिवीत व वित्तीय हानी होवू नये याकरीता सदर इमारतीच्या दुरुस्तीचे काम तातडीने करण्याच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण (२५-०६-२०२४) :** (१) हे खरे नाही
छताच्या दुरूस्ती दरम्यान प्लास्टर पडले होते.
(२) हे खरे नाही
(३) हे खरे नाही
(४) इमारतीचे दुरूस्तीचे काम जिल्हा नियोजन समिती अंतर्गत मंजूर करण्यात आले असून दुरुस्तीचे काम प्रगतीत आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही

---

**मोहाडी, कुशारी, खडकी, मुंढरी व तुमसर तालुक्यातील गोबरवाही, चिंचोली, मिटेवाणी, तुमसर, देव्हाडी रस्त्याची कामे निकृष्ट दर्जाची झाल्याबाबत**

**(८) ७०७१७ (३१-०८-२०२३). श्री.राजू कारेमोरे (तुमसर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) तुमसर-मोहाडी (जि.भंडारा) विधानसभा क्षेत्रातील जांब ते खडकी व गोबरवाही ते तुमसर तसेच देव्हाडी रस्त्याची हॅम योजनेअंतर्गत रस्ता, नाला, पथदिवे CD वर्क, बसस्टॉप व इतर कामे करण्यासाठी अंदाजे रक्कम रुपये ५०० कोटी इतका

खर्च करण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर डांबरी रस्ते, गावांतील रस्ते व नाल्यांचे काम निकृष्ट दर्जाचे झाले असून सर्व्हिस रोड, पथदिव्यांची कामे, शेती रस्ते व इतर कामे देखील निकृष्ट दर्जाची झाली असल्याने याबाबत स्थानिकांनी शासनाकडे अनेकदा तक्रारी केल्या असल्याचे निदर्शनास आले हे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर रस्त्याची कामे करणाऱ्या कंत्राटदार कंपनीची चौकशी करण्याच्या नागरीकांच्या तक्रारींवरुन लोकप्रतिनिधी यांनी दिनांक ३ ऑगस्ट, २०२१ व दिनांक १७ जून, २०२३ रोजीच्या पत्रान्वये सार्वजनिक बांधकाम मंत्री यांचेकडे मागणी केली असल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले व त्यानुसार संबंधित ठेकेदार व अधिकाऱ्यांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण (२४-०६-२०२४) :** (१) भंडारा जिल्ह्यात तुमसर- मोहाडी, भंडारा-पवनी व साकोली-लाखनी-लाखांदुर ह्या रस्त्यांवर हायब्रीड ॲन्युटी योजने अंतर्गत पॅकेज NAG १३२ व NAG १३३ ही कामे पूर्ण झालेली आहेत.

NAG १३२ या कामावर सद्यस्थितीत माईलस्टोनवर रु.१५२.०७ कोटी व ॲन्युईटीवर रु. ६०.१९ कोटी असे एकूण रु.२१२.१६ कोटी इतका खर्च झाला आहे.

NAG १३३ या कामावर सद्यस्थितीत माईलस्टोनवर रु.१५५.९२ कोटी व ॲन्युईटीवर रु. ५८.८४ कोटी असे एकूण रु. २१४.७६ कोटी इतका खर्च झाला आहे.

सदर दोन पॅकेजेस चा एकूण खर्च रु.४२६.९२ कोटी इतका आहे.

(२) व (३) निवेदन प्राप्त आहे.
(४) प्राप्त निवेदनाच्या अनुषंगाने मुख्य अभियंता, सा.बां. प्रादेशिक विभाग, नागपूर यांनी दिनांक २७/०३/२०२३ च्या पत्रान्वये अधीक्षक अभियंता, दक्षता व गुण नियंत्रण मंडळ, नागपूर यांचेमार्फत चौकशी आदेशित केली आहे. चौकशी अहवाल प्राप्त झाल्यानंतर अहवालातील निष्कर्षानुसार पुढील आवश्यक कार्यवाही करण्यात येत आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**बीड विधानसभा मतदार संघातील कामे प्रलंबित ठेवणाऱ्या कार्यकारी अभियंता यांची चौकशी करण्याबाबत**

**(९) ७१६०७ (२६-०३-२०२४). श्री.संदिप क्षिरसागर (बीड) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बीड विधानसभा मतदार संघातील (ता.बीड व शिरुर (का.)) रस्ते व पुलांच्या बांधकामांना माहे जुलै, २०२३ च्या पावसाळी अधिवेशनामध्ये पुरवणी मागणीनुसार प्रशासकीय मान्यता देण्यात आल्या आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर कामे सा.बां.वि.क्र.१ व २ बीड कार्यकारी अभियंता, श्री.तोंडे यांनी तात्काळ करणे अपेक्षित असतांना कामांत अनियमितता व सातत्याने मुख्यालयी गैरहजर राहत असल्यामुळे अनेक कामे प्रलंबित असून दिनांक २१ सप्टेंबर, २०२३ रोजी जा.क्र.योजना-२०२३/प्र.क्र.१३१/नियोजन १-अ नुसार २९ कामे रद्द समजण्यात यावे असे आदेश अधिक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, धाराशिव यांना कळविण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, स्थानिक लोकप्रतिनिधी व संबंधित कार्यालयाकडे श्री.तोंडे यांच्या विरोधात अनेक तक्रारी प्राप्त झाल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, श्री.तोंडे यांनी केलेल्या व प्रलंबित ठेवलेल्या कामांची नियमोचीत त्रयस्त समिती मार्फत स्तरनिहाय, खातेनिहाय, संचिकानिहाय, ज्ञापनासह तात्काळ चौकशीची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी पत्राद्वारे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधित दोषींवर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण (२१-०६-२०२४) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) सार्वजनिक बांधकाम विभागाने क्र.योजना २०२३/प्र.क्र.१३१/नियोजन-१अ, दि.२१.०९.२३ रोजीच्या आदेशान्वये २९ कामे रद्द करण्यात आली आहेत.
(३) होय, निवेदन प्राप्त आहे.
(४) होय, हे खरे आहे.
(५) संबंधित मुख्य अभियंता यांचेकडून स्वयंस्पष्ट अभिप्रायानुसार अहवाल प्राप्त झाल्यानंतर अहवालातील निष्कर्षानुसार पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पुणे-मुंबई-बंगळूर महामार्गावरील (वडगाव ते वारजे) सहापदरीकरण रस्त्याच्या प्रस्तावाबाबत**

**(१०) ७१६३० (०१-०३-२०२४). श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे-मुंबई-बंगळूर महामार्गावरील वडगाव ते वारजे दरम्यानच्या मार्गावरील सहापदरीकरण रस्त्याचा प्रस्ताव प्रलंबित असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२३ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, वडगाव ते वारजे रस्ता हा पाचपदरी असून त्याला दुसरा जोडरस्ता नसल्याने या रस्त्यावरुन जाणाऱ्या हजारो वाहनांना दररोज वाहतूक कोंडीचा सामना करावा लागत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी शासनाकडे वारंवार पाठपुरावा केला असून डीपीआर करुन देखील या रस्त्याचे सहापदरीकरण होऊ शकले नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर रस्ता सहापदरी करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दादाजी भुसे (१०-०६-२०२४) :** (१) अंशत: खरे आहे.

पुणे-बंगळूर राष्ट्रीय महामार्ग क्र.४८ (एन.एच.४८) रस्त्याच्या सहा पदरीकरणाचे काम भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणामार्फत प्रगतीपथावर आहे. पुणे-बंगळूर महामार्गावरील सातारा ते पुणे या १४०.३५ कि.मी. लांबीपैकी १३७.७२ किमी लांबीचे सहा पदरीकरणाचे काम पूर्ण झाले असून उर्वरीत २.६३ किमी लांबीतील सहा पदारीकरणाचे काम प्रगतीत आहे.
(२) वडगाव ते वारजे दरम्यान मुठा नदीवरील अस्तित्वातील पूल पाच पदरी असून त्याला अन्य जोडरस्ता नसल्याने या भागात वाहतूक कोंडी होते, ही बाब खरी आहे.
(३), (४) व (५) वाहतूक कोंडी टाळण्यासाठी वडगाव पुलाच्या दोन्ही बाजूस व मुठा नदीवरील पूलाच्या दोन्ही बाजूस स्वतंत्र रस्त्यांच्या पूलाचे काम मंजूर असून निविदा प्रक्रीया प्रगतीत आहे. निविदा प्रक्रीया पूर्ण झाल्यानंतर सदर काम हाती घेण्याचे नियोजन आहे.

या व्यतिरिक्त वडगाव ते वारजे दरम्यान मुठा नदीवरील अरुंद पूलामुळे होत असलेली वाहतूक कोंडी व नवले पूलाजवळील भागात वारंवार होणारे अपघात विचारात घेऊन यावर उपाययोजना करण्यासाठी सुरक्षा सल्लागार यांच्याकडून पाहणी करुन पुणे- सातारा राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ४८ वरील दरीपूल ते वारजे दरम्यान (५.२ किमी) सहा पदरी उन्नत महामार्गाचा (Elevated Highway) डीपीआर तयार करण्यात आला असून वरीष्ठ कार्यालयाकडे सादर करण्यात आला आहे.

---

## नाशिक येथील धान्य पुरवठा अधिकारी कार्यालयात विना आदेश कार्यरत असणाऱ्या व्यक्तीवर कारवाई करण्याबाबत

**(११) ७१६८० (०८-०२-२०२४). श्रीमती देवयानी फरांदे (नाशिक मध्य) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक येथील धान्य पुरवठा अधिकारी कार्यालयात खाजगी व्यक्ती विनापरवानगी कामकाज करीत असल्याची बाब सन २०१९-२०२० च्या लेखापरिक्षण अहवालामध्ये निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, लेखापरिक्षण अहवालात आक्षेप घेतलेली व्यक्ती अद्यापही धान्य वितरण अधिकारी कार्यालयात कार्यरत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. छगन भुजबळ (२४-०६-२०२४) :** (१) हे अंशतः खरे आहे.

सन २०१९-२०२० या कालावधीत कोरोना महामारीच्या कालावधीत नागरीकांना शिधापत्रिका संबंधित अर्ज कार्यालयात जमा करणेकामी एकत्रित येऊन कोरोना महामारीचा प्रादुर्भाव वाढु नये म्हणून सदर कालावधीत महा ई सेवा केंद्र यांचेकडे शिधापत्रिका संबंधित अर्ज जमा करणेबाबत सुचना देण्यात आलेल्या होत्या व सदर ५९ सेतु केंद्रचालकांनी विभाग निहाय नागरीकांकडून प्राप्त सदर अर्ज धान वितरण कार्यालयात जमा करणेकामी ६ प्रतिनीधी नियुक्त करून सदर नागरीकांचे कामकाज लोकसेवा हमी कायदा, २०१५ च्या अनुषंगाने वेळेत सुविधा उपलब्ध करून देणेकामी धान्य वितरण अधिकारी, नाशिक यांनी कोरोना महामारीत महा ई सेवा केंद्र व आपले सरकार केंद्र यांनी नामनिर्देशित केलेले ६ प्रतिनिधी यांची नेमणूक कोविड (कोरोना) कालावधी असल्याने धान्य वितरण अधिकारी, नाशिक यांनी केलेली होती, असे प्रभारी जिल्हा पुरवठा अधिकारी, नाशिक यांनी दिनांक ०४.१२.२०२३ च्या पत्रान्वये कळविले आहे.

(२) हे खरे नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## धान्य पुरवठा अधिकारी, नाशिक यांच्या कार्यालयातून "फोन पे" च्या माध्यमातून पैशांची मागणी करण्यात येत असल्याबाबत

**(१२) ७१६८३ (०८-०२-२०२४). श्रीमती देवयानी फरांदे (नाशिक मध्य) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धान्य पुरवठा अधिकारी, नाशिक यांच्या कार्यालयातून मोठ्या प्रमाणावर "फोन पे" च्या माध्यमातून पैशांची मागणी केली जात असल्याच्या तक्रारी महाराष्ट्र राज्य रेशन व केरोसीन दुकानदार महासंघ यांनी मा.मुख्यमंत्री यांच्याकडे दिनांक १ जुलै, २०२३ रोजी वा त्यासुमारास केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तक्रारीत नमूद करण्यात आलेल्या व्यक्तींची व दूरध्वनीची चौकशी कोणत्या यंत्रणेकडून करण्यात आली, चौकशीत काय आढळून आले,

(३) असल्यास, उक्त चौकशीच्या अनुषंगाने संबंधित दोषींविरोधात शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. छगन भुजबळ (२५-०६-२०२४) :** (१) होय, हे खरे आहे. मा. मुख्यमंत्री सचिवालय कक्ष, नाशिक येथे दिनांक ३१ जुलै, २०२३ रोजी धान्य वितरण कार्यालय, नाशिक येथील एका कर्मचाऱ्याविरुध्द याबाबत तक्रार दाखल झाली आहे.

(२) संबधित कर्मचारी यांनी दिलेल्या खुलाश्यानुसार सदरची तक्रार तक्रारदार यांच्या सह्यांचा गैरवापर करून दिल्याचे निदर्शनास आल्याने सदरची तक्रार सामान्य प्रशासन विभागाचे शासन परिपत्रक, दिनांक २५.०२.२०१५ अन्वये तक्रारींबाबत करावयाची कार्यवाही बाबत दिलेल्या सूचनांच्या अनुषंगाने सूचना क्र. ३ अन्वये तक्रारदार यांना विचारणा करण्यात आलेली असून तक्रार संबधितांनी दिलेली नसल्याने सदरची तक्रार निकाली काढण्यात आली आहे.
(३) धान्य वितरण कार्यालय, नाशिक यांचेकडील दिनांक २५.१०.२०२३ च्या आदेशान्वये संबंधित कर्मचारी यांना धान्य वितरण कार्यालय, नाशिक येथून कार्यमुक्त करण्यात आले आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मुंबईतील शाळांच्या वेळेत बदल करण्याबाबत**

**(१३) ७१७९६ (०९-०२-२०२४). ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईतील बहुसंख्य शाळा सकाळच्या सत्रात घेतल्या जात असून त्यामुळे विद्यार्थांना सकाळी लवकर उठून घाई गडबडीत अर्धपोटी त्याचप्रमाणे काहींना उपाशी पोटी शाळेत जावे लागते त्यामुळे अपुरी झोप व पुरेशा आहाराअभावी याचा परिणाम त्यांच्या सर्वांगीण विकासावर होत असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२३ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, ८ ते १० वयोगटातील विद्यार्थ्यांची शाळेची वेळ सकाळी ८.३० किंवा त्यानंतर ठेवावी, १६ वर्षे व त्यावरील विद्यार्थांची शाळा, कॉलेजची वेळ सकाळी १०.०० नंतर आणि १८ वर्षे व त्यावरील विद्यार्थांच्या वर्गाची वेळ सकाळी ११.०० नंतर करण्यात यावी अशी मागणी वारंवार होत असूनही याकडे दुर्लक्ष केले जात असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, तज्ज्ञ डॉक्टरांच्या मते इयत्ता १० वी पर्यंतच्या विद्यार्थांना सलग ९ ते १० तासांच्या झोपेची आवशक्यता असल्याचे मत व्यक्त केले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने मुंबईतील शाळकरी मुलांचे जीवनमान सुधारण्याकरिता तसेच शाळांच्या वेळांचे नियोजन करण्याकरिता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिपक केसरकर (२४-०६-२०२४) :** (१) यासंदर्भात राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे यांच्यामार्फत शाळांची वेळ बदलण्याविषयी अभ्यास करण्यात आला. यामध्ये विद्यार्थ्यांची झोप पूर्ण होत नसल्याचे व त्याचा परिणाम विद्यार्थ्यांच्या शारीरीक व मानसिक आरोग्यावर होत असल्याचे निर्दशनास आले आहे.
(२) यासंदर्भातील मागणीवर दुर्लक्ष केले आहे, हे खरे नाही.
(३) अशी बाब निर्दशनास आलेली नाही.
(४) राज्यातील सर्व माध्यमांच्या व सर्व व्यवस्थापनांच्या ज्या शाळांची पुर्व प्राथमिक ते इयत्ता ४ थी पर्यंतचे वर्ग भरण्याची वेळ सकाळी ९ वाजताच्या अगोदरची आहे, त्या शाळांनी नविन येणारे शैक्षणिक वर्ष सन २०२४-२५ पासून पुर्व प्राथमिक ते इयत्ता ४ थी पर्यंतचे वर्ग भरवण्याबाबतची वेळ सकाळी ९ किंवा ९ नंतर ठेवण्याबाबत शासन परिपत्रक दिनांक ०८.०२.२०२४ अन्वये सुचना करण्यात आलेल्या आहेत.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यातील कांदा उत्पादक शेतकऱ्यांना अनुदान मिळण्याबाबत**

**(१४) ७१९४१ (०१-०३-२०२४). श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.विनोद निकोले (डहाणू), श्रीमती मोनिका राजळे (शेवगांव - पाथर्डी), श्री.दिपक चव्हाण (फलटण) :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात झालेल्या अवकाळी पावसामुळे कांदयाच्या बाजारभावात मोठया प्रमाणात घसरण झाल्याने कांदा उत्पादक शेतकऱ्यांचा उत्पादन खर्च देखील वसूल झाला नसल्याचे माहे ऑगस्ट, २०२३ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले हे खरे आहे काय,

(२) कांदा उत्पादक शेतकऱ्यांना दिलासा मिळावा यासाठी राज्यातील कृषी उत्पन्न बाजार समित्यांमध्ये, खाजगी बाजार समित्यांमध्ये, थेट पणन अनुज्ञप्तीधारकाकडे अथवा नाफेडकडे दिनांक १ फेब्रुवारी, २०२३ ते दिनांक ३१ मार्च, २०२३ या कालावधीत लेट खरीप हंगामातील लाल कांदा विक्री केलेल्या शेतकऱ्यांना रुपये ३५० प्रति क्विंटल अनुदान देण्याचा निर्णय शासनाने घेतला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शेतकऱ्यांना सदरील कांदा अनुदानासाठी ८५७ कोटी इतक्या रुपयांची आवश्यकता असताना देखील शासनाने कांदा अनुदानासाठी सन २०२३ मधील पावसाळी अधिवेशनात सादर करण्यात आलेल्या पुरवणी मागण्यांमध्ये केवळ ५५० कोटीं रुपयांची तरतूद केली असल्याचे तसेच सहकार व पणन विभागाच्या दिनांक ३० ऑगस्ट, २०२३ रोजीच्या शासन निर्णय(शासन निर्णय क्रमांक– पूरक-२०२३/प्र.क्र.११७/ २४ स) नुसार शेतकऱ्यांना केवळ ४६५ कोटी वितरीत करण्यास मान्यता दिली असून पहिल्या टप्प्यात जास्तीत जास्त केवळ १०,००० रु अनुदान मिळणार असल्याचे माहे ऑगस्ट २०२३ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, दर्यापूर आणि अंजनगाव सुर्जी तालुक्यात मोठ्या प्रमाणात शेतकऱ्यांनी कांद्याचे उत्पादन घेतले असून शासनामार्फत जाहीर झालेल्या अनुदानासाठी अमरावती जिल्ह्यातील ५ तालुक्यात मोठ्या प्रमाणात कांदा उत्पादक शेतकरी असून देखील फक्त ३१ शेतकऱ्यांचे अर्ज प्राप्त झाल्याचे जिल्हा निबंधक सहकारी संस्था, अमरावती यांच्यामार्फत पणन, संचालक ,पुणे यांच्याकडे दिनांक १४ ऑगस्ट, २०२३ रोजी वा त्या सुमारास माहिती सादर केली असल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, राज्यातील शेतकऱ्यांना माहे ऑक्टोबर, २०२३ मध्ये वा त्या दरम्यान किती रकमेचे अनुदान वितरीत करण्यात आले असून कांदा उत्पादक शेतकऱ्यांना उर्वरित अनुदान वितरीत करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अब्दुल सत्तार (२७-०६-२०२४) :** (१) होय हे खरे आहे.

(२) होय हे खरे आहे.

राज्यातील कांदा उत्पादक शेतकऱ्यांनी फेब्रु व मार्च २०२३ मध्ये विक्री केलेल्या कांद्याकरीता रु. ३५० प्रति क्विंटल व जास्तीत जास्त २०० क्विंटल प्रति शेतकरी याप्रमाणे अनुदान देण्याचा दिनांक २७/३/२०२३ रोजी निर्णय घेण्यात आला.

(३) अंशत: खरे आहे.

पणन संचालनालयाने जून २०२३ मध्ये सादर केलेल्या प्राथमिक अंदाजानुसार विधीमंडळाच्या सन २०२३ च्या पावसाळी अधिवेशनात रु. ५५० कोटी इतकी रक्कम पुरवणी मागणीद्वारे मंजूर करण्यात आली. त्यापैकी रु. ४६५.९९ कोटी इतका निधी वितरणासाठी उपलब्ध झाल्याने पहिल्या टप्प्यात शासन निर्णय दि. ३०.०८.२०२३ अन्वये प्रथम टप्प्यात रू. १०.०० कोटी पेक्षा कमी अनुदानाची मागणी असलेल्या १४ जिल्हयातील पात्र लाभार्थ्यास संपूर्ण अनुदान व उर्वरित १० जिल्हयातील लाभार्थ्यांना रू.१०,०००/- इतक्या मर्यादेत अनुदान वितरणाचा निर्णय घेण्यात आला आहे.

(४) होय हे खरे आहे.

जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था अमरावती यांच्या अहवालानुसार एकूण ३१ अर्ज प्राप्त झाले असून, त्यापैकी २९ लाभार्थी छाननी अंती अपात्र ठरले आहे व २ पात्र लाभार्थी यांना रु. ६५,६९९/- इतके अनुदान वितरीत करण्यात

आले आहे.
(५) राज्यातील कांदा उत्पादक शेतकऱ्यांना शासन निर्णय दिनांक २७/३/२०२३ अन्वये घोषित केल्याप्रमाणे अनुदानासाठी एकूण रू ८५१.६७ कोटी इतका निधी आवश्यक आहे. त्यासाठी विधीमंडळाच्या सन २०२३ च्या पावसाळी अधिवेशनात रु.५५० कोटी व हिवाळी अधिवेशनात रू. ३०१.६७ कोटीची पुरवणी मागणी मंजूर करण्यात आली. कांदा अनुदानासाठी निधी टप्प्याटप्प्याने उपलब्ध झाल्याने आतापर्यंत पाच टप्प्यात एकूण ८३६,०७ कोटी इतके अनुदान वाटप करण्यात आले असून उर्वरित १५.६० कोटी अनुदान वितरणाची कार्यवाही सुरू आहे.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील सर्व अकृषी विद्यापीठे, महाविद्यालय, मान्यताप्राप्त शैक्षणिक संस्थांमध्ये अँटी रॅगिंग पथक नियुक्त करण्यास विलंब होत असल्याबाबत

**(१५) ७२१०७ (०९-०२-२०२४). श्रीमती अश्विनी जगताप (चिंचवड), श्री.सुनिल टिंगरे (वडगाव शेरी), श्री.चेतन तुपे (हडपसर) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील सर्व अकृषी विद्यापीठे व शैक्षणिक संस्थांमध्ये रॅगिंगच्या प्रकारांना प्रतिबंध करण्याच्या दृष्टीने राज्य शासनाने महाराष्ट्र रॅगिंग प्रतिबंधक अधिनियम, १९९९ लागू केला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पुणे व उद्योगनगरी पिंपरी-चिंचवड मध्ये वाढत्या रॅगिंगच्या प्रकारास प्रतिबंध करण्याकरिता तसेच अकृषी विद्यापीठ व शैक्षणिक संस्थांमध्ये प्रतिबंध करण्याकरिता आर. के. राघवन समितीच्या शिफारशींची अंमलबजावणी करण्यासाठी संचालक, उच्च शिक्षण संचालक, संचालनालय यांच्या वतीने वारंवार परिपत्रके काढून निर्देश देण्यात आले आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, राज्यातील सर्व विद्यापीठे, महाविद्यालय तसेच सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ मान्यताप्राप्त शैक्षणिक संस्थेमध्ये अँटी रॅगिंग स्कॉड नियुक्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे.
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत (दादा) पाटील (२६-०६-२०२४) :** (१) होय.
(२) होय,
(३) संबंधित शैक्षणिक संस्थांनी विद्यापीठांमध्ये व महाविद्यालयांमध्ये रॅगिंगला प्रतिबंध म्हणून विद्यापीठ व महाविद्यालयांकडून पालन करण्यात येत असल्याचे तसेच रॅगिंग विरोधी समिती कार्यरत असल्याचे संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, पुणे यांनी कळविलेले आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## धुळे जिल्ह्यामधून जाणाऱ्या नागपूर-सुरत महामार्गावरील चौपदरीकरणाचे काम अपूर्णावस्थेत असल्याबाबत

**(१६) ७२१६० (२९-०२-२०२४). श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) धुळे जिल्ह्यामधून जाणाऱ्या नागपूर-सुरत महामार्गावरील चौपदरीकरणाचे काम अपूर्णावस्थेत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, धुळे तालुक्यातील नेर ते देऊर, कुसुंबा ते लोणखेडी, आनंदखेडे, कुंडाने, चितोड इत्यादी ठिकाणी सर्व्हिस रोडचे काम अपूर्ण असून वाहनधारकांची गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर महामार्गाच्या चौपदरीकरणाचे काम पूर्ण करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण (१०-०६-२०२४) :** (१) हे खरे आहे.

सदर राष्ट्रीय महामार्ग केंद्रशासनाचे भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण यांचे अखत्यारित येतो. सदर काम पुर्ण करण्याची अंतिम तारीख दि. ८.५.२०१९ होती, परंतु संबंधित कंत्राटदाराच्या आर्थिक अडचणींमुळे सदर काम पुर्ण होऊ न शकल्याने माहे ऑगस्ट २०१९ मध्ये सदर कामाच्या करार संपुष्टात आणण्यात आला. उर्वरित कामासाठी नवीन कंत्राटदाराची नियुक्ती करण्यात आली असून सद्यास्थितीत काम प्रगतीपथावर आहे.

(२) हे खरे आहे.

कामाच्या करारनाम्यातील तरतुदीनुसार संबंधित कंत्रादारामार्फत सेवा रस्त्याचे बांधकाम करुन घेण्यात येत आहे. काही ठिकाणी भूसंपादनाच्या वादामुळे सेवा रस्त्याचे काम अपूर्ण आहे. भूसंपादनासंदर्भातील वाद जिल्हा प्रशासनाच्या मदतीने सोडविण्यात येत आहे.

(३) व (४) सदर काम वेळेत पुर्ण, दर्जेदार व करारनाम्यानुसार करुन घेण्याकरिता बांधकामाच्या देखरेखीसाठी या प्रकल्पावर प्राधिकृत अभियंता यांची नियुक्ती केलेली आहे. राष्ट्रीय हरित लवाद यांचे मुरुम/ खडी उत्खननासंबंधीचे आदेश, आरओबीच्या युटीलीटी स्थलांतरणासाठी लागणारा वेळ,स्थानिक लोकांच्या मागणीमुळे उद्भवलेल्या अतिरिक्त कामामुळे वाव बदल व जमिन अधिग्रहण, कंत्राटदाराच्या कामाची संथ गती इत्यादीमुळे कामास विलंब झालेला आहे. प्रकल्प पुर्ण करण्यासाठी माहे जून, २०२४ पर्यंतचा मुदतवाढीचा प्रस्ताव सक्षम अधिकाऱ्यांकडे विचाराधीन आहे.

---

## दहिसर चेक नाक्यावरील टोल वसुलीबाबत

**(१७) ७२१७८ (०४-०३-२०२४). श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दहिसर चेक नाका येथील टोल नाक्यामुळे तसेच महामार्गावर पडलेल्या खड्डयांमुळे होत असलेल्या वाहतूक कोंडीमुळे नागरिकांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागत असल्याचे माहे ऑगस्ट, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर टोल नाक्यावर पिवळया पट्टयाच्या बाहेर वाहनांची रांग लागत असून त्यांच्याकडून टोल न आकारता वाहने सोडून देणे आवश्यक असताना त्यांचेकडून टोल वसूल केला जात आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण (१२-०६-२०२४) :** (१) हे अंशत: खरे आहे.

दहिसर पथकर नाका परिसरात मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण कडून मेट्रो -९ (दहिसर ते मीरा- भाईंदर) प्रकल्पाचे काम, वाहनांची वाढती संख्या, मार्गिका विस्तारीकरणासाठी रस्त्याच्या बाजूस अतिरिक्त जागा उपलब्ध नसणे, त्यामुळे देखील वाहतूक कोंडी होते.

(२) हे खरे नाही.

टोलनाक्यावर वाहतूक कोंडी टाळण्यासाठी टोलपासून विशिष्ट अंतरावर पिवळा पट्टा आखण्याबाबत, सदर प्रकल्पाबाबतची शासन अधिसूचना तसेच करारनाम्यामध्ये कोणतीही तरतूद नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**इयत्ता तिसरी मराठी माध्यमाच्या परिसर अभ्यास या विषयाच्या पुस्तकातील चुका दुरुस्तीबाबत**

**(१८) ७२२५० (०९-०२-२०२४). श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.जयकुमार रावल (शिंदखेडा), श्री.राम कदम (घाटकोपर पश्चिम), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.सुरेश (राजूमामा) भोळे (जळगाव शहर) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती मंडळातर्फे (बालभारती) ने छपाई केलेल्या इयत्ता तिसरी मराठी माध्यमाच्या परिसर अभ्यास या विषयाच्या पुस्तकातील नाकाशात पालघर जिल्ह्यातील तालुक्यांची नावे चुकीची छापण्यात आल्याचे माहे सप्टेंबर, २०२३ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नकाशात वाडा तालुक्याचा उल्लेख वाडे, तर मोखाडा तालुक्याचा उल्लेख मोखाडे असा असल्यामुळे पालकांनी याबाबत तक्रार केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी चुकीची दुरुस्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिपक केसरकर (२४-०६-२०२४) :** (१) हे खरे नाही.

(२) याबाबत महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळाकडे आजअखेर कोणत्याही पालकांची तक्रार प्राप्त झालेली नाही.

राज्य शासनाने प्रादेशिक भाषेतील प्रमाणभूत स्थलनामांतराबाबत मार्गदर्शन करण्यासाठी शासन निर्णय दिनांक २० एप्रिल, १९८७ नुसार समिती गठीत केली आहे. सदर समितीच्या अहवालानुसार महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती मंडळाने मराठी स्थलनाम सूची तयार केली आहे. सदर सुचीतील विविध स्थलनामांचा वापर पाट्यपुस्तकात करण्यात येतो.

महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती मंडळाच्या पाठ्यपुस्तकांत सन १९६९ पासून स्थलनामांचा उल्लेख वाडे व मोखाडे असाच करण्यात येतो.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**लातूर येथे स्वतंत्र विद्यापीठ निर्माण करणेबाबत**

**(१९) ७२३५३ (०९-०२-२०२४). श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.झीशान सिद्दिकी (वांद्रे पूर्व), डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लातूर येथे ५५ हजार विद्यार्थी, ११८ महाविद्यालये असूनही स्वतंत्र विद्यापीठ दिले जात नसल्याचे निदर्शनास आले हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नांदेड येथील विद्यापीठात किरकोळ कामांसाठी ३०० किमीचा प्रवास करुन जावे लागत असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सोलापूर जिल्हयात सन २०१४ मध्ये लावण्यात आलेल्या निकषांप्रमाणे लातूर येथे स्वतंत्र विद्यापीठ निर्माण व्हावे अशी मागणी केली जात आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, लातूरमध्ये स्वतंत्र विद्यापीठ निर्माण होण्याकरीता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत (दादा) पाटील (२५-०६-२०२४) :** (१) अंशत: खरे आहे.
(२), (३) व (४) अंशत: खरे आहे.

तथापि, लातूर येथे विद्यापीठाचे उपकेंद्र स्थापन करण्यात आले असून सदर केंद्रातून महाविद्यालयीन विद्यार्थी, प्राध्यापक, कर्मचारी, पालक यांचेसाठी प्रशासकीय, शैक्षणिक सुविधा पुरविण्यात येत आहेत.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**भुसावळ जिल्ह्यातील शालेय पोषण आहाराकरीता काम करणाऱ्या महिलांना थकीत मानधन देण्याबाबत**

**(२०) ७२८८१ (१४-०२-२०२४). श्री.संजय सावकारे (भुसावळ) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भुसावळ येथील शालेय पोषण आहाराकरीता काम करणाऱ्या महिलांचे मानधन मागील ४ ते ५ महिन्यांपासून थकीत असल्याचे माहे ऑगस्ट, २०२३ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यासंदर्भात स्थानिक लोकप्रतिनिधींनी शालेय शिक्षण मंत्री यांना दिनांक १३ ऑगस्ट,२०२३ रोजी वा त्या सुमारास निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, महिलांचे थकीत मानधन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिपक केसरकर (२१-०६-२०२४) :** (१) अंशत: खरे आहे.
(२) हे खरे आहे.

मा. श्री. संजय सावकारे, विधानसभा सदस्य यांचे दि.११ ऑक्टोबर, २०२३ रोजीचे निवेदन शासनास प्राप्त झालेले आहे.
(३) व (४) प्रधानमंत्री पोषण शक्ती निर्माण योजनेंतर्गत जळगांव जिल्ह्यातील भुसावळ तालुक्यामध्ये कार्यरत असणाऱ्या स्वयंपाकी तथा मदतनीस यांचे जून-जुलै, २०२३ चे मानधन दि.२५ सप्टेंबर, २०२३ रोजी अदा करण्यात आले आहे. तसेच, तद्नंतर माहे एप्रिल, २०२४ पर्यंतचे मानधन विहित कालावधीत संबंधितांना अदा करण्यात आले आहे.

---

**धरणगावातून गोंदियाला जाणारा रेशनचा तांदूळ ताब्यात घेतल्याबाबत**

**(२१) ७२९०५ (२५-०२-२०२४). श्री.संजय सावकारे (भुसावळ) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) धरणगावातून गोंदियाला जाणारा रुपये ८ लाख ३० हजार किंमतीचा रेशनचा तांदूळ भुसावळ उपविभागीय पोलीस अधिकाऱ्यांच्या पथकाने नशिराबाद पोलिसांच्या मदतीने दिनांक ३ ऑक्टोबर, २०२३ रोजी वा त्यासुमारास ताब्यात घेतला, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अन्न व नागरी पुरवठा विभागाने याबाबत पंचनामा केला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणाची शासनाने चौकशी केली काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने संबंधित दोषींविरोधात कार्यवाही करुन कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. छगन भुजबळ (२४-०६-२०२४) :** (१) व (२) हे खरे आहे.
(३) सदर प्रकरणी उपविभागीय अधिकारी, जळगांव, यांचेमार्फत सुणावणी घेण्यात येऊन, सुनावणीअंती दि.२५.०१.२०२४ अन्वये प्रकरणातील जप्त केलेला एकूण वजन २९,४९० किलो तांदूळ नाशवंत असल्याने त्याची विल्हेवाटीची कार्यवाही भविष्यातील कोणत्याही सक्षम न्यायालयाच्या निर्णयाच्या अधिन राहून जिवनावश्यक नियम कायदा, १९५५ चे कलम ६ अ (२) पोटकलम (१) (दोन) मधील तरतूदीचे अनुषंगाने तात्काळ विल्हेवाट लावण्यासाठी

तहसिलदार, जळगांव यांनी प्रकरणातील जप्त असलेला संपूर्ण तांदूळाचा साठा पोलीसांच्या ताब्यातून घेऊन तो शासकीय धान्य गोदामात जमा करावा व संपूर्ण धान्य मालाच्या साठ्याची एक स्वतंत्र रजिस्टरमध्ये नोंद घेऊन सदरचा माल पुढील महिन्याच्या नियतनातून शासन निर्देशाप्रमाणे वाटप करून सदरील वाटपाचा स्वतंत्र अहवाल संबंधित कार्यालयास सादर करण्याबाबतचा आदेश पारित करण्यात आला.

तथापि, सदर आदेशाविरूद्ध प्रतिवादी यांनी मा.अति. जिल्हा व सत्र न्यायाधिश-४, जळगाव यांचेकडे याचिका दाखल केली असून, सदर प्रकरण अंतिम निर्णयासाठी न्यायप्रविष्ठ आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## चिखलदरा (जि.अमरावती) मेळघाट येथील जिल्हा परिषद शाळेतील वर्गखोली व स्वयंपाक घराची झालेली दुरवस्था

**(२२) ७२९६३ (१४-०२-२०२४). ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.धिरज देशमुख (लातूर ग्रामीण), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.सुभाष धोटे (राजूरा), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चिखलदरा (जि.अमरावती) तालुक्यातील मेळघाट येथील जिल्हा परिषद शाळेतील वर्गखोली व स्वयंपाक घराच्या शेडची (किचन शेड) दुरवस्था झाल्याने विद्यार्थ्यांना व स्वयंपाक करणाऱ्या गृहिणींच्या जिविताला धोका निर्माण झाल्याचे माहे ऑगस्ट, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय ,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने आढावा घेऊन मेळघाट येथील जिल्हा परिषद शाळेतील वर्गखोली व स्वयंपाक घराचे (किचनशेड) बांधकाम करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिपक केसरकर (२१-०६-२०२४) :** (१) व (२) अंशत: खरे आहे.

अमरावती जिल्ह्यामधील चिखलदरा तालुक्यातील मेळघाट येथील जिल्हा परिषद शाळेतील वर्गखोलीचे निर्लेखन करुन सन २०२३-२४ मध्ये जिल्हा वार्षिक योजनेंतर्गत वर्गखोलीच्या बांधकामाची कार्यवाही सुरु आहे.

तसेच, जुने मोडकळीस आलेले किचनशेड पाडण्यात आले असून तात्पुरत्या स्वरुपाचे शेड तयार करुन दैनंदिन पोषण आहार शिजविण्यात येतो.

राज्यातील एकूण ७,५३७ शाळांमध्ये नव्याने स्वयंपाकगृह उभारणीचा प्रस्ताव केंद्र शासनास सादर करण्यात आला होता. केंद्र शासनाच्या प्रकल्प मंजूरी मंडळाच्या (PAB) बैठकीमध्ये सदर प्रस्तावास तत्वत: मान्यता दिलेली आहे. सन २०२४-२५ या आर्थिक वर्षामध्ये मंजूर निधीमधून प्रस्तुत शाळांमध्ये नव्याने स्वयंपाकगृह उभारण्याचे प्रस्तावित आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## सोलापूर शहरात टेक्निकल टेक्सटाईल पार्क उभारण्याबाबत

**(२३) ७३५०६ (०५-०३-२०२४). श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण) :** सन्माननीय **वस्त्रोद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर शहरात टेक्निकल टेक्सटाईल पार्क होण्यासाठीचे निवेदन स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.वस्त्रोद्योग मंत्री महोदयांना माहे जून मध्ये वा त्यादरम्यान देवूनही अद्यापपर्यंत कार्यवाही झाली नसल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत सोलापूर रेडीमेंड गारमेंट असोसिएशन, सोलापूर यांचे निवेदन व लोकप्रतिनिधींनी केलेली मागणी तातडीने पूर्ण करण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत (दादा) पाटील (२१-०६-२०२४) :** (१) सोलापुर शहरात टेक्नीकल हब होण्यासाठीचे श्री. जगदीश आर. पाटील, मा. नगरसेवक, सोलापूर महानगरपालिका, सोलापूर यांनी मा.मंत्री (वस्त्रोद्योग) महोदयांना अग्रेषित केलेले दि.२८.११.२०२३ रोजीचे निवेदन शासनास प्राप्त झाले आहे.
(२) व (३) दि.०२ जून २०२३ रोजीच्या शासन निर्णयानुसार राज्याचे नवीन एकात्मिक व शाश्वत वस्त्रोद्योग धोरण, २०२३-२०२८ जाहिर झालेले आहे. सदर धोरणानुसार राज्यात टेक्नीकल टेक्सटाईल विकासावर भर देण्यासाठी राज्यात ४ झोनमध्ये एकूण ६ टेक्नीकल टेक्सटाईल पार्क उभारण्याबाबत निर्णय घेण्यात आला आहे.

---

**तळेरे ते गगनबाबडा येथील रस्त्यांची व इतर कामे अपूर्णावस्थेत असल्याबाबत**

**(२४) ७३६७३ (२९-०२-२०२४). श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.राजेश एकडे (मलकापूर), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.झीशान सिद्दिकी (वांद्रे पूर्व), श्री.विक्रमसिंह सावंत (जत), श्री.रवींद्र धंगेकर (कसबापेठ), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.सुभाष धोटे (राजूरा), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) तळेरे ते गगनबावडा हा रस्ता सिंधुदूर्ग व कोल्हापूर जिल्ह्यांना जोडणारा २१ कि.मी रस्ता असून येथील रस्त्याची कामे व इतर कामे अपूर्ण अवस्थेत असल्यामुळे वाहतूक कोंडी होत असल्याचे माहे ऑगस्ट, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, वाहतूक कोंडी दूर करुन रस्त्याची कामे पूर्ण करण्याच्यादृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण (१९-०६-२०२४) :** (१) अंशत: खरे आहे.
माहे ऑक्टोबर २०२३ मध्ये झालेल्या अतिवृष्टीमुळे रस्त्याच्या पृष्ठभागावर मोठ्या प्रमाणात खड्डे पडले होते. सदर ठिकाणी काम करतेवेळी घाट अरुंद असल्यामुळे एकेरी वाहतुक ठेवून काम करणे क्रमप्राप्त होते. त्यामुळे कामाच्या ठिकाणी काही काळ वाहतुक नियमन करुन काम करण्यात आले व रस्ता सप्टेंबर २०२३ मध्ये सुस्थितीत करण्यात आला.
(२) रस्ता सुस्थितीत करण्यात आला असल्याने वाहतुक कोंडीचा प्रश्न उद्भवत नाही. या रस्त्याच्या २१ किमी लांबीच्या दुपदरीकरणाअंतर्गत कॉंक्रीटकरणाचे काम प्रगतीपथावर आहे. या व्यतिरिक्त १४.३० किमी लांबीच्या कामास केंद्रशासनाकडून सन २०२३ -२४ या आर्थिक वर्षाकरिता मंजुरी प्राप्त झाली असून सदर काम निविदा स्तरावर आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही

---

**बुलढाणा येथे महसूल भवन बांधण्याबाबत**

**(२५) ७३९५३ (०४-०३-२०२४). श्री.संजय गायकवाड (बुलढाणा) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बुलढाणा येथे महसूल भवन बांधण्याबाबत निवासी उपजिल्हाधिकारी, बुलढाणा यांनी दिनांक १५ डिसेंबर, २०२१ रोजी वा त्यासुमारास कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, बुलढाणा यांना स्मरण पत्र दिले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासंदर्भात मुख्य अभियंता, यांच्या तांत्रिक मान्यतेसह अद्यावत दरसूचीवर आधारीत प्रस्ताव सादर करण्यात आला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर कामाची सद्यःस्थिती काय आहे, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण (०४-०६-२०२४) :** (१) हे खरे नाही

तथापि, कक्ष अधिकारी, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई यांनी त्यांचे पत्र क्र. विसतांप्र २०२१/प्र.क्र.२६८/ई-८, दिनांक ०२/१२/२०२१ अन्वये बुलडाणा येथे महसूल भवन बांधण्याबाबत जिल्हाधिकारी, बुलडाणा यांना स्मरणपत्र दिले आहे.

(२) व (३) हे खरे नाही

मुख्य अभियंता यांच्या तांत्रिक मान्यतेसह अद्ययावत दरसूचीवर आधारित प्रस्ताव जिल्हाधिकारी, बुलडाणा यांचेकडे शासनाच्या मंजूरीस्तव कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, बुलडाणा यांचे पत्र क. साबांबु/तांशा/२०२४/३२८४, दिनांक १५/०४/२०२४ अन्वये सादर करण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**नागपूर बोशी तुळजापूर राष्ट्रीय महामार्गावरील वाहतुक कोंडीमुळे कच्च्या मालाची आयात निर्यात करणाऱ्या वाहनधारकांन अडचणनिर्माण होत असल्याबाबत**

**(२६) ७४०२१ (२९-०२-२०२४). श्री.नामदेव ससाणे (उमरखेड) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यवतमाळ जिल्ह्यातील महागांव, उमरखेड, हद्दगाव आणि वारंगा या तालुक्यांमधून नांदेड येथे जाणारा राष्ट्रीय महामार्ग नागपूर-नांदेड हा मोठा व्यापारी महामार्ग असतांनाही नागपूर बोरी तुळजापूर राष्ट्रीय महामार्गावर वारंवार होणाऱ्या वाहतूक कोंडीमुळे नागपूर-नांदेड कच्च्या मालाची आयात निर्यात करणाऱ्या वाहनधारकांना हा रस्ता वाहतूकीसाठी अडचणीचा होत असल्याची बाब माहे सप्टेंबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महागांव ते नांदेड वारंगापर्यंतचा येणारा ७० कि.मी चा परिसर हा प्रकल्प संचालक, नांदेड यांच्या अखत्यारित येत असून या कार्यालयाच्या दुर्लक्षामुळे अद्यापही हा रस्ता वाहतुकीसाठी योग्य नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले व तद्नुषंगाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण (१९-०६-२०२४) :** (१) हे खरे नाही.

सदर महामार्ग केंद्रशासनाचे भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण यांचे अखत्यारीत आहे. नागपूर -बोरी-तुळजापूर या राष्ट्रीय महामार्गावर वाहतुक कोंडी झाल्याचे व त्यामुळे कच्चा मालाची आयात निर्यात करणाऱ्या वाहनधारकांना हा रस्ता वाहतुकीसाठी अडचणीचा होत असल्याची बाब निदर्शनास आलेली नाही.

(२) वारंगा ते महागाव राष्ट्रीय महामार्ग क्र. ३६१ वरील किमी २५३/७०० ते किमी ३२०/५८० (एकूण लांबी ६६.७८ किमी) चौपदारीकरणाचे काम भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण मार्फत सवलतदारास देण्यात आले होते. सदर काम सवलतदाराने वेळेत पुर्ण न केल्याने रस्त्याच्या देखभाल व दुरुस्तीसाठी अडचणी निर्माण झाल्या होत्या. त्यासाठी माहे डिसेंबर २०२२ मध्ये सवलतदाराच्या जोखीमेवर स्वतंत्र निविदेद्वारे दुरुस्तीचे काम पुर्ण करुन सद्यस्थितीत रस्ता वाहतूकीसाठी सुस्थितीत ठेवण्यात आला आहे.
(३) व (४) वारंगा ते महागाव या लांबीतील चौपदरीकरणाचे काम विहीत मुदतीत पुर्ण न झाल्याने भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण मार्फत मुळ सवलतदाराच्या जागी नवीन सवलतदाराची माहे ऑक्टोबर, २०२३ मध्ये नेमणूक करण्यात आली असून सद्यास्थितीत ८० टक्के काम पुर्ण करण्यात आले आहे व उर्वरित काम माहे ऑक्टोबर, २०२४ पर्यंत पुर्ण करण्याचे नियोजन आहे.

---

## गोंदिया जिल्ह्यातील सडक अर्जुनी ते सौंदळ राष्ट्रीय महामार्गावर उभारण्यात येणाऱ्या लोहमार्गावरील पुलाच्या बांधकामाबाबत

**(२७) ७४०४५ (०५-०३-२०२४). श्री.मनोहर चंद्रिकापूरे (अर्जुनी-मोरगांव) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) गोंदिया जिल्ह्यातील सडक अर्जुनी ते सौंदळ राष्ट्रीय महामार्गावर उभारण्यात येणाऱ्या लोहमार्गावरील पुलाच्या बांधकामात राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण (एनएचआय) विभागाकडून दुर्लक्ष होत असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त पुलाच्या बांधकामास बांधकाम कंत्राटदार व संबंधित अधिकाऱ्यांच्या संगनमताने विलंब होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर पुलावर अपघाताचा धोका निर्माण झाला असून पुलाचे बांधकाम पूर्ण होण्याकरिता स्थानिक लोकप्रतिनिधींनी एनएचआय विभागाकडे पाठपुरावा करुन देखील त्याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष होत असल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत संबंधित अधिकारी, बांधकाम कंत्राटदार यांच्याविरोधात शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण (२०-०६-२०२४) :** (१), (२), व (३) हे खरे नाही
सदर काम केंद्रशासनाच्या भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण यांचे अखत्यारीत आहे. रेल्वे प्रशासनाकडून रेल्वे उड्डाणपुलाच्या आराखड्यास मंजुरी मिळण्यास व रेल्वेचे केबल स्थलांतरीत करण्यास विलंब झाल्याने पूल बांधकामास विलंब झाला आहे. सद्यस्थितीत कामाची भौतीक प्रगती ८९ टक्के झाली असुन काम प्रगतीपथावर आहे.
(४) प्रकल्पाच्या कंत्राटदारास करार संपुष्टात आणण्याची नोटीस भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण, नवी दिल्ली यांनी दि. २९.०२.२०२४ रोजीच्या पत्रान्वये दिलेली आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## रावराजून ते वझूर पुलाचे काम अपूर्णावस्थेत असल्याबाबत

**(२८) ७४०८० (०४-०३-२०२४). डॉ.राहूल पाटील (परभणी) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पूर्णा-पालम तालुक्यांना जोडणाऱ्या प्रकल्पांतर्गत मागील ५ वर्षांपूर्वी उद्‌घाटन केलेल्या रावराजून ते वझूर पुलाचे काम अद्यापही पूर्ण झालेले नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कोट्यवधी रुपये खर्च करुनही उक्त पुलाचे काम प्रलंबित असल्याची कारणे काय आहेत,
(३) असल्यास, याबाबत शासनाने कोणती चौकशी केली आहे, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने कार्यवाही करुन संबंधित ठेकेदारावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण (२५-०६-२०२४) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) कोविड-१९ प्रादुर्भाव व तद्नंतर गोदावरी नदीवरील दिग्रस बंधा-याचे काम पूर्ण झाल्याने या पूलाच्या ठिकाणी नदी पात्रात ६.०० मीटर उंची पर्यंत पाणी साठून राहत असल्यामुळे पूलाचे काम करण्यासाठी वर्षभरातून अल्प कालावधी होता. त्यामुळे कामाच्या भौतिक प्रगतीवर परिणाम झाला आहे.
(३) करारनाम्यातील अटी व शर्तीनुसार कामाबाबत संबंधित कंत्राटदारावर दिनांक १३/०६/२०२३ पासून प्रतीदिन रु.७५,४७७/- विलंब शुल्क आकारण्यात आले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### बीड विधानसभा क्षेत्रात व जिल्ह्यामध्ये झालेल्या निकृष्ट कामाची व अनियमिततेची चौकशीसह कार्यवाही होणेबाबत

**(२९) ७४१५२ (०५-०३-२०२४). श्री.संदिप क्षिरसागर (बीड) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बीड विधानसभा क्षेत्रात व जिल्ह्यात शासनस्तरावरील व जिल्हास्तरावरील समाजकल्याण विभाग (राज्यस्तर व जिल्हा परिषदस्तर) लेखाशीर्ष २५१५, अल्पसंख्याक, तांडा सुधार योजना, डोंगरी विकास, आरोग्य विभाग, एएमसी (२९५९, २२१६) (एमडब्ल्युओ, डिपॉझिट वर्क, जिल्हा वार्षिक योजना व इतर योजनेअंतर्गत विविध ठिकाणी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अखत्यारीत सन २०१९ते २०२३ या कालावधीत कामे करण्यात आली आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर कामे करण्यासाठी अनुक्रमे देवा इलेक्ट्रीक्स, बीड, ज्योतिबा इलेक्ट्रीक्स, बीड, सावंत इलेक्ट्रीक्स बीड, मे. वैष्णवी इलेक्ट्रीकल्स सर्व्हीसेस, मे. समर्थ इलेक्ट्रीकल्स व जनरल सप्लायर्स औद्योगिक वसाहत संस्था, बीड अशा एकूण १२ कंत्राटदारांकडून कामे करण्यात आल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर कंत्राटदारांनी केलेली कामे ही निकृष्ट दर्जाची केली असल्यामुळे याबाबत सार्वजनिक बांधकाम विभागाच्या संबंधित अधिकाऱ्यांकडे तक्रारी करुनही त्यांच्यावर काहीही कार्यवाही न करता कंत्राटदारांना कामांचे पूर्ण देयक अदा करण्यात आले असून त्यामध्ये कोट्यवधीचा आर्थिक गैरव्यवहार झाल्याचे माहे सप्टेंबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी नागरिकांनी व ग्रामस्थांनी केलेल्या तक्रारींनुसार तेथील स्थानिक लोकप्रतिनिधींनी निकृष्ट कामाची व अनियमिततेची त्रयस्त समितीमार्फत चौकशी करण्याची मागणी दिनांक १९ ऑक्टोबर, २०२३ रोजी वा त्यासुमारास पत्रान्वये अपर मुख्य सचिव, मुख्य सचिव, सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग यांचेकडे पत्रान्वये केली असल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणाबाबत शासनाने कोणती चौकशी केली आहे, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार संबंधितांविरुध्द कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण (२५-०६-२०२४) :** (१) होय
(२) होय
(३) नाही

(४) व (५) होय

अधीक्षक अभियंता(विद्युत) दक्षता व गुण नियंत्रण मंडळ,छत्रपती संभाजीनगर यांचे कार्यालयाच्या चौकशी पथका मार्फत चौकशी करण्याचे काम प्रगतीत आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**डोणगाव (जि.बुलढाणा) येथील राष्ट्रीय महामार्गावर खड्डयांमुळे नागरीकांची गैरसोय होत असल्याबाबत**

**(३०) ७४१६५ (०५-०३-२०२४). श्री.संजय रायमुलकर (मेहकर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) डोणगांव (जि.बुलढाणा) येथील राष्ट्रीय महामार्गावर मोठ्या प्रमाणात पडलेल्या खड्डयांमुळे नागरिकांना त्रास सहन करावा लागत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर नादुरुस्त खड्डयांची पाहणी राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाचे अधिकारी व कर्मचाऱ्यांनी माहे एप्रिल, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन खड्डयांची दुरुस्ती करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण (१९-०६-२०२४) :** (१) अंशत: खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) सद्यास्थितीत संबंधित कंत्राटदाराने रस्त्याची देखभाल व दुरुस्तीची कामे पुर्ण केलेली आहेत व रस्ता वाहतुकीसाठी सुस्थितीत करण्यात आलेला आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**कै. शेषराव पाटील जिनिंग व प्रेसिंग सहकारी संथ्येच्या ई- निविदेमध्ये झालेला गैरव्यवहार**

**(३१) ७४४६२ (१५-०२-२०२४). श्री.कैलास गोरंट्याल (जालना) :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कै. शेषराव पाटील जिनिंग व प्रेसिंग सहकारी संस्थेच्या फॅक्टरी क्र. १ च्या १० एकर जमीन इमारत/मशिनरी मालमत्ता विक्री करण्याकरीता काढलेल्या ई-निविदेमध्ये मोठया प्रमाणात गैरव्यवहार करण्यात आला असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या विक्री प्रक्रियेमध्ये देण्यात आलेली जाहिरात ही दिनांक १९ मे, २०२२ रोजी वा त्या सुमारासच्या मूळ दैनिक भास्कर, नागपूर आवृत्तीमध्ये नसून बोगस दैनिक भास्कर, नागपूर आवृत्ती वृत्तपत्रात छपाई करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने या संस्थेच्या जमीनी व मशिनरी विक्रीचा व्यवहार चुकीच्या पध्दतीने झाल्याने हा व्यवहार तातडीने रद्द करुन दोषी असलेल्या अधिकारी व कर्मचाऱ्यांविरुध्द निलंबनाच्या कारवाईसह खरेदीदारांविरुध्द फौजदारी गुन्हे नोंदविण्याची कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अब्दुल सत्तार (०६-०६-२०२४) :** (१) कै. शेषराव पाटील जिनिंग व प्रेसिंग सहकारी संस्था, पुसद जि.यवतमाळ या संस्थेच्या मालमत्ता विक्रीस परवानगी देण्याबाबतच्या पणन संचालक, महाराष्ट्र राज्य पुणे यांच्या दि.२३.१०.२०२० रोजीच्या आदेशातील अटीनुसार विक्री प्रक्रिया राबविण्यात आलेली आहे. या संस्थेच्या मालमत्ता विक्री व्यवहार व प्रक्रियेमध्ये गैरव्यवहार झाल्याबाबत मा.लोकप्रतिनिधी व संस्थेशी संबंधित व्यक्तींकडून पणन संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्याकडे व शासनास तक्रारी प्राप्त झालेल्या आहेत.
(२) हे खरे नाही.

विक्री प्रक्रियेबाबत दै. भास्कर, नागपूर व दै.महाराष्ट्र टाईम्स, नागपूर या दोन वृत्तपत्रात दि.१९.०५.२०२२ रोजी इंग्रजी भाषेत जाहिरात देण्यात आलेली आहे.
(३) संस्थेच्या जमिन व मालमत्ता विक्री व्यवहारास शासनाने दिनांक २०.१२.२०२३ रोजी दिलेली स्थगिती दि.१३.०३.२०२४ रोजी उठविली आहे.

सदर संस्थेच्या जमीन इमारत/मशिनरी मालमत्ता विक्री व्यवहाराबाबत श्री.सतिश मालपानी, मोतीनगर, पुसद, जि.यवतमाळ यांनी राज्य शासन, पणन संचालक महाराष्ट्र राज्य पुणे, विभागीय सहनिबंधक सहकारी संस्था अमरावती, अध्यक्ष, शेषराव पाटील जिनिंग व प्रेसिंग सहकारी संस्था व इतर यांच्याविरुध्द मा.उच्च न्यायालय, खंडपीठ नागपूर येथे रिट याचिका क्र.२१३१/२०२४ दाखल केली असून प्रकरण सद्य:स्थितीत न्यायप्रविष्ट आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मुस्लीम समाजाला आरक्षण देण्याबाबत**

**(३२) ७४५४८ (२५-०२-२०२४). श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी) :** सन्माननीय **अल्पसंख्यांक विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुस्लीम समाजाला शैक्षणिक प्रवेशाकरिता आरक्षण देण्याची मागणी लोकप्रतिनिधींकडून व मुस्लीम समाज, संघटनांकडून शासनाकडे सातत्याने केली जात आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मुस्लीम समाजाला शैक्षणिक प्रवेशाकरिता आरक्षण देण्यास मा.न्यायालयाचाही विरोध नाही, हे यापूर्वी स्पष्ट झाले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, अल्पसंख्याक विभागामार्फत अल्पसंख्याकांच्या शैक्षणिक, सामाजिक तसेच आर्थिक विकासाकरीता विविध योजना राबविण्यात येत असून सदर योजनांकरीता अर्थसंकल्पित केलेल्या निधीपैकी वित्त विभागाने उपलब्ध करुन दिलेला निधी बहुतांश खर्च करण्यात येतो, हे ही खरे आहे काय,
(४) तसेच मुस्लीम समाजाला (विशेष मागास प्रवर्ग-अ) नोकरी व शैक्षणिक संस्थांमध्ये प्रवेशासाठी ५ टक्के आरक्षण देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, मुस्लीम समाजाला शैक्षणिक प्रवेशाकरिता आरक्षण देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अब्दुल सत्तार (०७-०६-२०२४) :** (१) हे खरे आहे,
(२) सामान्य प्रशासन विभागाच्या दिनांक ०९.०७.२०१४ रोजीच्या अध्यादेशानुसार मुस्लिम (विशेष मागासप्रवर्ग) समाजासाठी नोकरीमध्ये व शैक्षणिक संस्थामध्ये प्रवेशासाठी ५ टक्के आरक्षण देण्यात आले होते. यामध्ये मुस्लिम धर्मातील एकूण ५० मागास घटकांना आरक्षणाचा लाभ अनुज्ञेय राहणार होता. तथापि, याबाबत मा.उच्च न्यायालयात याचिका दाखल करण्यात आल्या आहेत. मा.उच्च न्यायालयाने दिनांक १४.११.२०१४ रोजी या प्रकरणी अंतरिम निर्णय दिला आहे. सदर अंतरिम आदेशाद्वारे शासकीय व अनुदानित शैक्षणिक संस्थेमध्ये प्रवेशासाठी दिलेले आरक्षण अबाधित ठेवण्यात आलेले आहे. परंतु खाजगी विनाअनुदानित संस्थांमधील प्रवेश व शासकीय सेवेतील भरतीसाठी दिलेल्या आरक्षणाला स्थगिती दिली आहे. सदर अध्यादेशाचे दिनांक २३.१२.२०१४ पर्यंत कायद्यात रुपांतर न झाल्याने अध्यादेश व्यपगत झाला आहे. तथापि, दिनांक ०९.०७.२०१४ ते दिनांक २३.१२.२०१४ या काळातील शासकीय तसेच अनुदानित शैक्षणिक संस्थांमधील प्रवेश अबाधित ठेवण्यात आलेले आहेत. तसेच दिनांक ०९.०७.२०१४ ते दिनांक

१४.११.२०१४ या दरम्यानच्या काळातील शासकीय सेवेत झालेल्या नियुक्त्या अबाधित राहणार आहेत.
(३) हे खरे आहे.
(४) हे खरे नाही,
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**भामरगड (जि.गडचिरोली) तालुक्यातील गुंडेनूर नाल्यावर पूल बांधण्याबाबत**

**(३३) ७५१६५ (११-०२-२०२४). डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्रीमती जयश्री जाधव (कोल्हापूर उत्तर), श्री.मोहनराव हंबर्डे (नांदेड दक्षिण), श्री.धिरज देशमुख (लातूर ग्रामीण) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भामरगड (जि.गडचिरोली) तालुक्यातील गुंडेनूर नाल्यावर पूल नसल्याने ग्रामस्थांना मृतदेह खाटेवर बांधून हा दुधडी भरुन वाहणारा नाला पार करावा लागत असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, लाहेरी येथील प्राथमिक आरोग्य केंद्र हे तीन ते चार किलोमीटर अंतरावर असून उक्त नाल्यावर पूल नसल्याने या परिसरातील आदिवासींना पावसाळ्यात जीवघेणा प्रवास करावा लागतो, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त परिस्थितीमुळे गावच्या आदिवासी बांधवाना अनेक समस्यांना सामना करावा लागत असून त्यांची गैरसोय लक्षात घेता शासनाने या प्रकरणाची चौकशी करुन याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण (१०-०६-२०२४) :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे आहे.
(३) गुंडेनूर नाल्यावर पुलाच्या बांधकामासाठी रस्ते वाहतुक व महामार्ग मंत्रालय, नवी दिल्ली यांनी माहे मार्च २०२२ मध्ये प्रशासकीय व तांत्रिक मान्यता दिलेली आहे. सदर पुलाच्या बांधकामासाठी निविदा प्रक्रीया पुर्ण झाली असुन वनविभागाची परवानगी घेवून सदर काम माहे जानेवारी २०२३ मध्ये सुरु करण्यात आलेले आहे. सद्यस्थितीत या पुलाचे बांधकाम प्रगतीपथावर असून ४७ टक्के बांधकाम पुर्ण झालेले आहे. सदर बांधकाम लवकरच पुर्ण करण्याचे नियोजन आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**चिखली आणि इतर तालुक्यांसाठी समृद्धी महामार्गाला जवळच्या इंटरचेंजसाठी कार्यवाही करणेबाबत**

**(३४) ७५२४९ (०५-०३-२०२४). श्रीमती श्वेता महाले (चिखली) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चिखली, बुलढाणा, मोताळा व मलकापूर या तालुक्यातील नागरिकांना हिंदू हृदयसम्राट स्वर्गीय बाळासाहेब ठाकरे समृद्धी महामार्गावर जाण्यासाठी सद्य:स्थितीत असलेला इंटरचेंज हा २५ किमी दूरचा मार्ग असल्याने कमी वेळात अंतर कमी असलेल्या रस्त्यांच्या पर्यायासाठी सार्वजानिक बांधकाम मंत्री, महाराष्ट्र राज्य यांचेसोबत चर्चा करुन निर्णय घेण्यात येईल असे आश्वासन दिले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त मागणी केल्यानुसार याबाबत बैठकीचे आयोजन करण्यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक २८ जुलै, २०२३ रोजी वा त्यासुमारास मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांनी लेखी स्वरुपात आदेश दिले आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दादाजी भुसे (३१-०५-२०२४) :** (१), (२) व (३) चिखली, बुलढाणा, मोताळा व मलकापूर या तालुक्यातील नागरीकांना हिंदु हृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे महाराष्ट्र समृध्दी महामार्गावर जाण्यासाठी पर्यायी रस्त्यांबाबत मा.मंत्री, सार्वजनिक बांधकाम यांच्यासोबत चर्चा करुन निर्णय घेण्याच्यादृष्टीने बैठकीचे नियोजन करुन पुढील आवश्यक कार्यवाही करण्याचे नियोजन आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### नांदगाव-येवला या रस्त्याचे काम मागील दोन वर्षापासून संथगतीने सुरु असल्याबाबत

**(३५) ७६११९ (०४-०३-२०२४). श्री.सुहास (आण्णा) व्दारकानाथ कांदे (नांदगाव) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नाशिक जिल्ह्यातील येवला सार्वजनिक बांधकाम विभागांतर्गत नांदगाव-येवला या रस्त्याचे काम मागील दोन वर्षापासून अत्यंत संथगतीने सुरु आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त रस्त्याचे काम व डांबरीकरण हे अत्यंत निकृष्ट दर्जाचे झाल्याने अवघ्या दोन-तीन महिन्यांतच रस्ता उखडून ठिकठिकाणी खड्डे पडल्याने वाहनधारकांना या रस्त्यावरुन प्रवास करतांना तारेवरची कसरत करावी लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त रस्त्याच्या कामाची शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले आहे व त्यानुषंगाने निकृष्ट दर्जाचे काम करणाऱ्या ठेकेदार कंपनीवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण (१७-०५-२०२४) :** (१) कोविड मुळे प्रकल्पाच्या भैतिक प्रगतीवर अंशतः परिणाम झाला हे खरे आहे. तथापि सद्यस्थिती सदरचे काम भौतिकदृष्ट्या पूर्ण करण्यात आले आहे.
(२) व (३) सदरचे काम सवलत करारनाम्यात तरतुदी व विनिर्दिष्ट मानकाप्रमाणे करण्यात आले आहे. कामात समाविष्ट लांबीत काही ठिकाणी रस्त्याच्या डांबरी पृष्ठभागावर पडलेले खड्डे कारनाम्यातील तरतुदी प्रमाणे संबंधित कंत्राटदाराकडून भरून रस्ता सुस्थितीत करून घेण्यात येत आहे. विहित मुदतीत काम पूर्ण न केल्याने सवलत करारनाम्यातील तरतुदी प्रमाणे संबंधित कंत्राटदारावर दंडात्मक कार्यवाही करण्यात आली आहे
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### पुणे शहरातील वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी वर्तुळाकार रस्त्याचे काम करणेबाबत

**(३६) ७६२०४ (०५-०३-२०२४). श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.विक्रमसिंह सावंत (जत), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्रीमती जयश्री जाधव (कोल्हापूर उत्तर), श्री.मोहनराव हंबर्डे (नांदेड दक्षिण), श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.शिरीष चौधरी (रावेर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे शहरातील वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी शासनाने येथे वर्तुळाकार रस्त्याचे काम हाती घेतले असून पूर्व आणि पश्चिम अशा दोन भागात भूसंपादन करण्याचे निश्चित केले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर भूसंपादनासाठी मावळ, मुळशी आणि हवेली तालुक्यांतील ३१ गावांतील स्थानिकांनी संमतीपत्रे दिलेले नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर भूसंपादनासाठी विलंब होत असल्याने या गावातील ज्या स्थानिकांनी संमतीपत्रे दिलेले नाहीत त्यांच्याकडून भूसंपादनाची संमतीपत्रे मिळविण्याबाबत कोणती कार्यवाही करण्यात आली आहे काय,

(४) तसेच शासनाने जाहिर केलेल्या दरापेक्षा अधिक दर मिळवून देऊ असे सांगत स्थानिक दलाल शेतकऱ्यांची दिशाभूल करीत असून हे प्रकार रोखण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण (३१-०५-२०२४) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) अंशत: खरे आहे.
एकूण भूसंपादन क्षेत्राच्या अंदाजे ५२ % क्षेत्रातील स्थानिकांनी संमतीपत्रे दिलेली नाहीत.
(३) संमतीपत्रे न दिलेल्या भूधारकांच्याबाबतीत महाराष्ट्र महामार्ग अधिनियम, १९५५ मधील तरतूदीनुसार विनासंमतीचे निवाडे जाहीर करण्यात आले. त्यानुसार भूसंपादनाची प्रक्रिया प्रगतीपथावर आहे.
(४) सदर बाब निदर्शनास आलेली नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## कडेगाव (जि.सांगली) येथे धान्याची साठवणूक करण्यासाठी गोदामे उभारण्याबाबत

**(३७) ७६४०१ (२५-०२-२०२४). श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.विक्रमसिंह सावंत (जत), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.ऋतुराज पाटील (कोल्हापूर दक्षिण), श्रीमती जयश्री जाधव (कोल्हापूर उत्तर), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर), श्री.धिरज देशमुख (लातूर ग्रामीण) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कडेगाव (जि.सांगली) येथील रेशन धान्य दुकानांमध्ये पुरवठा करण्यात येणाऱ्या धान्याची साठवणूक करण्यासाठी गोदामे नसल्यामुळे येथे प्रत्येकी १ हजार ८० मेट्रिक टन क्षमतेच्या दोन नवीन धान्य गोदामांच्या उभारणीसाठी शासनाने मान्यता दिली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त नवीन गोदामांसाठी लागणाऱ्या आठ कोटीच्या अंदाजपत्रकाच्या निधीस शासनाने मान्यता दिली असून देखील अद्यापपर्यंत सदर गोदामांचे काम सुरु झालेले नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, धान्य साठवणूकीसाठी गोदामे नसल्याने तेथील रेशन दुकानदार व सामान्य लोकांची मोठी गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर गोदामांचे काम सुरु होण्याच्यादृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. छगन भुजबळ (०५-०६-२०२४) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) हे खरे नाही. सद्य:स्थितीत कडेगाव तालुक्यासाठी आवश्यक असणारे धान्य विटा येथील शासकिय धान्य गोदामामध्ये साठविले जाते व तेथून दुकानामध्ये पोच केले जाते. त्यामुळे रेशन दुकानदार व सामान्य लोकांची गैरसोय होण्याचा प्रश्नच उद्धवत नाही.
(४) प्रस्तुत गोदामाचे काम प्रगती पथावर असून लवकरात लवकर काम पुर्ण करण्याचे नियोजन आहे.
(५) प्रश्नच उद्भवत नाही.

---

## नाशिक शहरातील बाह्य अंतर्गत व मध्यम रिंग रोड विकसित करण्याबाबत

**(३८) ७६७२४ (०४-०३-२०२४). ॲड.राहुल ढिकले (नाशिक पूर्व) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

वि.स. २५३ (24)

(१) नाशिक शहराचा प्रचंड विस्तार होत असणे, नाशिक शहराचे वाढत्या लोकसंख्येबरोबर वाहनांची संख्या प्रचंड वाढणे तसेच आगामी सिंहस्थ कुंभमेळयाच्या अनुषंगाने वाहतूक व्यवस्थेसाठी नाशिक शहरातील बाह्य अंतर्गत व मध्यम रिंग रोड विकसित करणे गरजेचे असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, नाशिक महानगरपालिकेची आर्थिक परिस्थिती अत्यंत नाजूक असल्याने सदरील रिंग रोडचा विकास महानगरपालिकेमार्फत होऊ शकत नसल्याने सदर रिंग रोडसाठी महाराष्ट्र शासनाच्या नगरविकास विभागामार्फत किंवा महाराष्ट्र रस्ते विकास महामंडळामार्फत तातडीने शहरातील बाह्य व अंतर्गत रोडचा विकास करण्याबाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी (नाशिक पूर्व) यांनी दिनांक १० जानेवारी, २०२३ रोजी वा त्यासुमारास मा.मुख्यमंत्री व मा.उपमुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांना पत्राद्वारे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरील मागणीच्या अनुषंगाने सहायक कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग यांनी क्र.विकाक-२०२३/प्र.क्र.१९०/रस्ते-८, दिनांक १.०४.२०२३ याद्वारे उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य विकास विकास महामंडळ मर्यादित यांना तात्काळ प्रस्ताव शासनास सादर करण्याचे आदेश देण्यात आले होते, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदरील रिंग रोडसाठी निर्माण करण्यासाठी मा.उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ मर्यादित यांनी क्र.एमआरडीसी-२०२३/०५ दिनांक १२.०४.२०२३ रोजी मा.कार्यकारी अभियंता महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ मर्यादित नाशिक यांना तातडीने प्रस्ताव सादर करण्याबाबत सूचित करण्यात आले होते, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, कार्यकारी अभियंता महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ मर्यादित, नाशिक यांनी अद्यापपर्यंत कोणतीही कार्यवाही केली नसल्याची गंभीर बाब निदर्शनास आली असल्याने, नाशिक शहरातील रिंग रोड निर्मितीसाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण (३०-०५-२०२४) :** (१) होय, हे खरे आहे,
(२) होय, अंशतः खरे आहे.

प्रा. देवयानी सुहास फरांदे यांचे दिनांक १९.१२.२०२२ चे मा.मुख्यमंत्री, महोदयांना सादर केलेले पत्र तसेच ॲड. श्री.राहुल ढिकले यांचे दिनांक ३१.०१.२०२३ चे मा.मुख्यमंत्री, महोदयांना सादर केलेले पत्र महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळास प्राप्त झाले आहे.
(३) होय, अंशतः खरे आहे.

सहायक कक्ष अधिकारी, सार्वजनिक बांधकाम विभाग,यांचे विकाक-२०२३/ प्र.क्र.१९०/रस्ते-८, दिनांक १०.०४.२०२३ च्या पत्रान्वये सदर प्रकरणी आवश्यक ती कार्यवाही करुन केलेल्या कार्यवाहीचा अहवाल शासनास सादर करण्याच्या सूचना महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळास देण्यात आलेल्या आहेत.
(४) होय, अंशतः खरे आहे.

मा.श्री.हेमंत तुकाराम गोडसे, खासदार, लोकसभा यांनी अधिक्षक अभियंता (रा.म), महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ शिबीर कार्यालय, नाशिक यांना दिनांक १२.०७.२०२३ रोजी पाठविलेले पत्र महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळास प्राप्त झाले आहे.
(५) सदरील प्रकल्पाचा सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्यासाठी सल्लागाराची नियुक्ती दिनांक २०.०७.२०२३ रोजी करण्यात आली आहे. सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्याचा कालावधी ८ महिने आहे. सल्लागाराने प्रस्तावित नाशिक परिक्रमामार्गासाठी (रिंग रोड) विविध आखणी पर्यायांचा अभ्यास करून अंतिम आखणी प्रस्ताव महामंडळास सादर केला आहे. त्यानुसार महामंडळाने दिनांक ३१.०१.२०२४ रोजी प्रस्ताव सादर केला असून सदर प्रस्ताव आखणी शासन मंजूरीसाठी प्रस्तावित करण्यात आला आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## जालना (जि.नांदेड) येथून समृध्दी महामार्ग जात असल्याने तेथील बाधित शेतकऱ्यांना जमिनीचा मावेजा चार पट देण्याबाबत

**(३९) ७६९२० (०५-०३-२०२४). श्री.मोहनराव हंबर्डे (नांदेड दक्षिण) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जालना-नांदेड (जि.नांदेड) समृध्दी महामार्ग जात असून बाधित शेतकऱ्यांच्या मागण्या व जमिनीचा मावेजा शासनाने चार पट जास्त देण्यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.मुख्यमंत्री व सार्वजनिक बांधकाम उपक्रम मंत्री, महाराष्ट्र राज्य यांना माहे जुलै, २०२३ मध्ये वा त्या दरम्यान लेखी निवेदनाद्वारे पत्र दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त मौजे विष्णूपुरी, झरी, पांगरा, गुंडेगाव व तुप्पा ही गावे नांदेड वाघाळा महानगरपालिका परिसरात असल्यामुळे हया जमिनी कमर्शियल झोनमध्ये असून सदर जमिनीचे मूल्यांकन महानगरपालिका दराप्रमाणे करावे अशी प्रमुख मागणी या भागातील बाधित शेतकऱ्यांनी केल्याचे निवेदनात सादर केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर बाधित शेतकऱ्यांच्या मागण्यांसाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दादाजी भुसे (१२-०६-२०२४) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) जिल्हा नांदेड येथील संपादनात येत असलेली सर्व १२ गावे ग्रामीण क्षेत्रात असून, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका क्षेत्रात / हद्दीत एकही गाव येत नाही. तरी सदर गावांच्या मूल्यांकनाबाबत नियमोचित कार्यवाही करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मौजे नायगव्हाण, लामकाना, गेवराई कुबेर, बनगाव, वरझडी, वडखा, पिरवाडी, महालपिंप्री, ते चिकलठाणा (ता.जि.छत्रपती संभाजीनगर) या नवीन जिल्हामार्गाचे काम सुरु करण्याबाबत

**(४०) ७७३८८ (०५-०३-२०२४). श्री.हरिभाऊ बागडे (फुलंब्री) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे नायगव्हाण, लामकाना, गेवराई कुबेर, बनगाव, वरझडी, वडखा, पिरवाडी, महालपिंप्री ते चिकलठाणा (ता.जि.छत्रपती संभाजीनगर) हा नवीन जिल्हामार्गाचे काम सुरु करण्यात आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर नवीन जिल्हामार्ग अद्यापपर्यंत पूर्ण झालेला नसल्यामुळे नागरिकांची होणारी गैरसोय टाळण्याकरिता सदरहू रस्त्याचे काम तातडीने पूर्ण करण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण (१०-०६-२०२४) :** (१) व (२) सदर रस्ता प्रजिमा दर्जाचा असून रस्त्याची लांबी ३०.१३० कि.मी. इतकी आहे. या लांबी पैकी १२.५४० कि.मी. लांबी सुस्थितीत आहे. ९.९१ कि.मी. लांबीतील रस्त्यावरील खड्डे भरुन रस्ता वाहतूकीस सुस्थितीत ठेवण्यात आला आहे.

उर्वरित लांबीतील रस्त्याची कामे निधी, निकष व प्राधान्य क्रमानूसार हाती घेण्याचे नियोजन आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## चाकण तळेगाव (जि.पुणे) येथील खालुंब्रे परिसरातील रस्त्यांची झालेली दुरवस्था

**(४१) ७७४०१ (०४-०३-२०२४). श्री.दिलीप मोहिते-पाटील (खेड आळंदी) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चाकण-तळेगाव (जि.पुणे) येथील खालुब्रे परिसरातील रस्त्यांची दुरवस्था झाल्याने नागरिकांना रस्त्यावरुन प्रवास करणे अडचणीचे होत असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर रस्त्यांची दुरुस्ती करण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली आहे,
(३) असल्यास, रस्त्यांच्या दुरुस्तीच्या उपाययोजनांचे स्वरुप आणि त्यासाठी येणारा खर्च तसेच काम पूर्ण होण्यास किती कालावधी अपेक्षित आहे, तद्नुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण (१९-०६-२०२४) :** (१) हे खरे आहे. सन २०२३ मधील अतिवृष्टीमुळे किमी ५/०० ते किमी ५४/०० या लांबीमध्ये रस्ता बऱ्याच ठिकाणी क्षतीग्रस्त झाला होता
(२) सदर रस्त्याची दुरुस्ती करुन रस्ता वाहतुकीसाठी सुस्थितीत ठेवण्यात आला आहे. तसेच रस्त्याची वेळोवेळी देखभाल व दुरुस्ती करण्याच्या सूचना संबंधित कंत्राटदारास देण्यात आलेल्या आहेत
(३) तळेगाव-चाकण- शिक्रापूर या भागात ६ लेनच्या उन्नत महामार्गाचे बांधकाम करण्याचे नियोजन करण्यात आले असून त्यानुसार सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्यात आला आहे. सदर प्रकल्पासाठी एकूण अंदाजित खर्च रु. ६४४६ कोटी आहे. सदर प्रकल्पास रस्ते वाहतुक व महामार्ग, मंत्रालय अथवा भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण यांचेकडील कोणत्याही योजनेअंतर्गत अद्याप मंजुरी प्राप्त झालेली नाही. सदर मंजुरी प्राप्त होताच काम हाती घेण्याचे नियोजन आहे. दरम्यान भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण यांचेमार्फत वाहतुक सुरळीत ठेवण्याच्या दृष्टीने या रस्त्याची देखभाल व दुरुस्ती केली जात आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही

---

**मौलाना आझाद रिसर्च ॲण्ड ट्रेनिंग इन्स्टिट्युट (मार्टी) या नावाने स्वायत्त संस्था स्थापन करण्याबाबत**

**(४२) ७७६३२ (२८-०२-२०२४). श्री.चंद्रकांत ऊर्फ राजुभैय्या रमाकांत नवघरे (बसमत) :** सन्माननीय **अल्पसंख्यांक विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शासनाने मागासवर्गीय यांच्या सामाजिक, धार्मिक व शैक्षणिक स्थितीत सुधारणा व्हावी या हेतुने बार्टी, सारथी महाज्योती, टार्टी या स्वायत्त संस्थांची निर्मिती केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्यातील मुस्लिम समाज हा देखील सामाजिक, आर्थिक व शैक्षणिकदृष्ट्या कमकुवत असल्याने अल्पसंख्याक मुस्लिम तरुणांच्या सामाजिक, आर्थिक व शैक्षणिक स्थितीत सुधारणा करण्यासाठी, अल्पसंख्याक मुस्लिम तरुणांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी तसेच समाजातील विद्यार्थ्यांचे शासकीय / निमशासकीय रोजगार / शिक्षण क्षेत्रात प्रमाण वाढावे, यासाठी शासनाने बार्टी, सारथी, महाज्योती व टार्टी (आदिवासी संदर्भात) या स्वायत्त संस्थांच्या धर्तीवर राज्यात मौलाना आझाद रिसर्च ॲण्ड ट्रेनिंग इन्स्टिट्यूट (मार्टी) या नावाने स्वायत्त संस्था स्थापन करण्यात यावी, अशी मागणी अल्पसंख्यांक मुस्लिम समाजाकडून शासनास करण्यात आली असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर मागणी संदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अब्दुल सत्तार (१०-०६-२०२४) :** (१) व (२) होय.
(३) उचित कार्यवाही सुरू आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**बीड जिल्ह्याच्या मतदार संघातील शिरुर (का) रायमोहा-राजुरी नवगण रोड या रस्त्यांच्या कामाच्या अनियमिततेबाबत**

**(४३) ७७८१५ (२८-०२-२०२४). श्री.संदिप क्षिरसागर (बीड) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बीड जिल्ह्याच्या मतदार संघातील शिरुर (का) रायमोहा-राजुरी नवगण रोड या रस्त्यांच्या कामाची प्रगती व सद्य:स्थिती काय आहे,

(२) असल्यास, उक्त रस्त्याचे काम निकृष्ट दर्जाचे करण्यात आले असून यात मोठ्या प्रमाणात गैरकारभार करण्यात आला असल्याची तक्रार तेथील लोकप्रतिनिधींनी मुख्य सचिव, सचिव सार्वजनिक बांधकाम विभाग मंत्रालय, मुंबई तसेच मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, औरंगाबाद यांचेकडे दिनांक १ ऑक्टोबर, २०२३ रोजी लेखी पत्राद्वारे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भात चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार संबंधित दोषींविरोधात कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण (२४-०६-२०२४) :** (१) कोविड प्रादुर्भावामुळे कामाच्या प्रगतीवर अंशत: परिणाम झाला हे खरे आहे. सद्यस्थिती ७०% काम पूर्ण झाले असून उर्वरित काम जून २०२४ पर्यन्त पूर्ण करणेचे नियोजन आहे.

(२) दि.०१.१०.२०२२ चे निवेदन प्राप्त आहे.

(३) स्थानिक लोकप्रतिनिधी यांच्या निवेदनाच्या अनुषंगाने सदर कामाची तपासणी अधिक्षक अभियंता, दक्षता व गुण नियंत्रण मंडळ, छत्रपती संभाजीनगर यांनी दिनांक २९/११/२०२२ रोजी केली आहे. या पाहणीमध्ये दक्षता व गुण नियंत्रण मंडळाकडून नोंदविण्यात आलेल्या त्रुटींची पुर्तता संबंधित कंत्राटदाराकडून स्वखर्चाने करुन घेण्यात आली आहे. उर्वरित त्रुटीची पुर्तता करण्याचे काम प्रगतीत आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मालेगांव (जि.नाशिक) शहरात शिधावाटप दुकानात निकृष्ट दर्जाचा व अपुरा धान्याचा पुरवठा होत असल्याबाबत**

**(४४) ७८०६४ (२५-०२-२०२४). श्री.मुफती मोहम्मद इस्माईल अब्दुल खालिक (मालेगांव मध्य) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मालेगांव (जि.नाशिक) शहरातील शिधावाटप दुकानामार्फत शासनाकडून मोफत पुरविण्यात येत असलेल्या धान्याचा पुरवठा निकृष्ट दर्जाचा व अपुरा करण्यात येत असल्याचे माहे नोव्हेंबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाच्या संजय गांधी निराधार योजना, श्रावण बाळ योजना आदी योजनांचा लाभ मिळावा याकरिता ऑनलाईन नोंदी करणे बंधनकारक असल्याने शिधापत्रिकाधारकांनी नावे ऑनलाईन पध्दतीने नोंदणी करुनही त्यांची नावे ऑनलाईनमधून गहाळ झाल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शिधावाटप दुकानात शिधापत्रिकाधारक धान्य घेण्यास गेल्यावर दुकानदार त्यांना ऑनलाईन नोंदणीमध्ये नाव नसल्याचे सांगून धान्य देण्यास नकार देत असल्याचेही निदर्शनास येत आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) तसेच, उक्त शहरातील शिधावाटप दुकानांना गेल्या तीन ते चार वर्षांपासून शासनाकडून अनुदान प्राप्त झालेले नाही, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. छगन भुजबळ (०५-०६-२०२४) :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.
(३) हे खरे नाही.
(४) हे खरे नाही.

शिधावाटप दुकानांचे अनुदान शासनाकडून प्राप्त होताच दरमहा नियमित संबंधित शिधावाटप दुकानदार यांना त्यांचे बँक खातेवर जमा केले जाते. सद्य:स्थितीत माहे फेब्रुवारी, २०२४ पर्यंत मार्जिन रक्कम संबंधित दुकानदार यांच्या खात्यामध्ये जमा करण्यात आली आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**जैन समाजाच्या न्याय व हक्कासाठी व सार्वगिणी विकासासाठी एक स्वतंत्र आयोगाची स्थापना करण्याबाबत**

**(४५) ७८०६९ (२९-०२-२०२४). श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी) :** सन्माननीय **अल्पसंख्यांक विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जैन समाजाच्या न्याय व हक्कासाठी व सर्वांगीण विकासासाठी एक स्वतंत्र आयोगाची स्थापना करण्याची मागणी लोकप्रतिनिधीनी दिनांक २८ ऑक्टोबर, २०२३ रोजी वा त्यासुमारास उप मुख्यमंत्री तथा वित्त मंत्री, महाराष्ट्र राज्य यांना लेखी निवेदन दिले होते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त निवेदनानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अब्दुल सत्तार (०७-०६-२०२४) :** (१) हे खरे आहे,
(२) राज्यातील मुस्लिम, ख्रिश्चन, बौद्ध, शिख, पारशी, जैन व ज्यू या सात लोकसमुहांना अल्पसंख्याक म्हणून घोषीत करण्यात आलेले आहे. राज्यातील अल्पसंख्याकांच्या हितांचे संरक्षण करण्यासाठी, अल्पसंख्याकांच्या न्याय व हक्कांसाठी महाराष्ट्र राज्य अल्पसंख्याक आयोगाची स्थापना करण्यात आलेली आहे. महाराष्ट्र राज्य अल्पसंख्याक आयोग राज्यातील सर्व धार्मिक अल्पसंख्याकांच्या कल्याणासाठी, त्यांच्या सर्वांगिण विकासासाठी कार्यरत आहे. त्यामध्ये जैन समुदायाचाही समावेश आहे
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**उल्हासनगर येथील ४०-फ उप कार्यालयात अन्न धान्यामध्ये होत असलेल्या गैरव्यवहाराबाबत**

**(४६) ७८३२९ (२५-०२-२०२४). श्री.कुमार आयलानी (उल्हासनगर), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.किसन कथोरे (मुरबाड) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) उल्हासनगर येथील ४०-फ उप कार्यालयाच्या अधिकारी श्रीमती ज्योती भोर यांना लोकप्रतिनिधींनी अन्न धान्य वितरण व्यवस्थेबाबत व अन्न धान्य वाटपात होत असलेल्या गैरव्यवहाराबाबत तसेच ट्रक शीट, बार कोड, बार कोड असलेला मोबाईल नंबर, दुकानदार यांचा अधिकृत मोबाईल नंबर अशा अनेक विषयाबाबत दिनांक १६ ऑक्टोबर, २०२३ रोजी वा त्यासुमारास माहिती मागितली, हे खरे आहे काय,(२) असल्यास, श्रीमती भोर यांनी लोकप्रतिनिधींना दिनांक २० ऑक्टोबर, २०२३ रोजी अपूर्ण माहिती दिली असून सदर माहिती पूर्ण देण्याची मागणी लोकप्रतिनिधींनी संबंधित अधिकाऱ्यांना केली आहे, त्यांचे वरिष्ठ उपनियंत्रक, ठाणे यांचेकडूनसुद्धा अद्यापही पूर्ण माहिती न मिळाल्याने संबंधित अधिकारी यांच्यावर शिस्तभंगाची कारवाई करुन त्यांची इतरत्र बदली करावी, अशी मागणी लोकप्रतिनिधींनी अन्न व नागरी पुरवठा मंत्री व नियंत्रक आणि उप नियंत्रक, ठाणे यांना दिनांक २४ ऑक्टोबर, २०२३ रोजी वा त्यासुमारास केली, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच, उक्त ४०-फ उप कार्यालयांतर्गत ऑनलाईन करण्याची कामे सुद्धा थांबविली असल्याने नागरिकांना अन्न व धान्यापासून वंचित ठेवत असल्याचे निदर्शनास येत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. छगन भुजबळ (२५-०६-२०२४) :** (१) होय. हे खरे आहे.
(२) हे अंशत: खरे आहे.

श्रीम.ज्योती भोर यांनी लोकप्रतिनिधींना दिनांक २० ऑक्टोबर, २०२३ रोजी अपूर्ण माहिती दिली असल्याची बाब खरी नाही.

तथापि, श्रीम.ज्योती भोर यांच्याविरुध्द शिस्तभंगाची कार्यवाही करून त्यांची ४० फ उप शिधावाटप कार्यालय येथून बदली करण्याची लोकप्रतिनिधींनी दिनांक २४ ऑक्टोबर, २०२३ रोजीच्या पत्रान्वये मागणी केल्याची बाब खरी आहे.
(३) हे खरे नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**हिंगणा–नागपूर मार्गावरील वाढते अपघात रोखण्याबाबत**

**(४७) ७८३५२ (०४-०३-२०२४). श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) हिंगणा-नागपूर मार्गावरील हिंगणा ते वानाडोंगरी या मार्गावरील मागील महिनाभरात झालेल्या विविध अपघातांत चार निष्पाप नागरिकांचा बळी गेला असल्याचे दिनांक ४ नोव्हेंबर, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या मार्गावर किरकोळ अपघातांचे प्रमाणदेखील दिवसेंदिवस वाढत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त मार्गावरील वाढत्या अपघातांकडे कार्यकारी अभियंता, राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण यांचे जनहित सामाजिक संघटनेने दिनांक १ नोव्हेंबर, २०२३ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदनाद्वारे लक्ष वेधले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती चौकशी केली आहे, चौकशीत काय आढळून आले आहे, त्यानुषंगाने कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहेत,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण (२५-०६-२०२४) :** (१) सदर रस्त्यावर दि.०१/११/२०२३ रोजी वाहनचालकाने भरघाव वेगाने व निष्काळजीपणे वाहन चालविल्याने दुचाकी चालकास धडक दिल्याने अपघात होऊन उपचारादरम्यान वाहनचालकाचा मृत्यु झाल्याची नोंद आहे.
(२) हे खरे नाही.
(३) निवेदन प्राप्त आहे.
(४) सदर रस्त्यावर हायब्रीड ॲन्युटी योजने अंतर्गत कामाच्या सवलत करारनाम्यातील तरतूदी नुसार नियुक्त करण्यात आलेल्या रोडसेफ्टी इंजिनियर यांचेकडून अहवाल प्राप्त झाल्यानंतर पुढील आवश्यक कार्यवाही करण्यात येत आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मालेगांव (जि.नाशिक) शहरातील स्वस्त धान्य दुकानांमध्ये होत असलेला गैरव्यवहार**

**(४८) ७८३९५ (२५-०२-२०२४). श्री.मुफती मोहम्मद इस्माईल अब्दुल खालिक (मालेगांव मध्य) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मालेगांव (जि.नाशिक) शहरातील स्वस्त धान्य दुकानांमध्ये मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार व काळाबाजार होत असल्याचे माहे नोव्हेंबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, धान्य पुरवठा विभागाकडून दिनांक ३० जून, २०२३ रोजी जाहिरनामा प्रसिध्द झाला असून त्यामध्ये शहरातील बचत गटांच्या नावावर पूर्वीपासून पाच ते सहा धान्य दुकाने असतांना त्यांनाच नवीन दुकाने देण्यात आल्याचे समोर आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, धान्य पुरवठा विभागामध्ये मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार होत असून यासंदर्भात चौकशी करुन नव्याने मंजूरी दिलेल्या दुकानांची मंजूरी त्वरित थांबवावी, अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधिंनी जिल्हाधिकाऱ्यांकडे निवेदनाद्वारे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर विभागात होत असलेला गैरव्यवहार व काळाबाजारासंदर्भात शासनाने कोणती चौकशी केली, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने संबंधित दोषींवर कार्यवाही करुन कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. छगन भुजबळ (०७-०६-२०२४) :** (१) नाही, माहे नोव्हेंबर,२०२३ मध्ये धान्य वितरण कार्यक्षेत्रातील स्वस्त धान्य दुकानांमध्ये गैरव्यवहार व काळाबाजार झालेला नाही.

या कार्यालयामार्फत देण्यात आलेल्या धान्य नियतन आदेशानुसार धान्याचे नियतन बसवून सर्व स्वस्त धान्य दुकानदारांची परमीटे गोदामपाल मालेगाव शहर यांचेकडेस सुपूर्त करण्यात येऊन त्यानुसार गोदामपाल हे सर्व स्वस्त धान्य दुकानदार यांना परमिटानुसार धान्य दिले आहे. त्याप्रमाणे स्वस्त धान्य दुकानदारांनी लाभार्थ्यांना धान्याचे वाटप केलेले आहे. याबाबतचा पुरवठा निरीक्षक यांनी तपासणीचा अहवाल धान्य वितरण कार्यालयास सादर केलेला आहे.

(२) धान्य वितरण अधिकारी , मालेगाव यांचे माहितीप्रमाणे धान्य वितरण मालेगाव शहर यांच्या कार्यक्षेत्रातील ६ अकार्यान्वित दुकानासाठी जाहीरनामा प्रसिध्दीची व पुढील अनुषंगिक कार्यवाही करण्यात आली आहे. त्यानुसार धान्य वितरण कार्यालयामार्फत लिफाफाबंद अर्ज जिल्हा पुरवठा शाखेस सादर करण्यात आलेले होते. त्यानुसार नवीन रास्तभाव दुकान निवड समितीने विहीत कार्यवाही केली आहे. त्यानुसार मंजूर करण्यात आलेल्या दुकानांना प्राधिकारपत्र मंजुरीबाबतचे आदेश देण्यात आलेले आहेत. तसेच, जाहीरनामा २०२३ च्या अनुषंगाने मालेगाव धान्य वितरण कार्यक्षेत्रात एकाच बचत गटाला एकापेक्षा जास्त दुकाने मंजूर करण्यात आलेले नाहीत.

(३) धान्य पुरवठा विभागामध्ये गैरव्यवहार नाही. तसेच नव्याने मंजूरी दिलेल्यांची मंजूरी थांबविण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी निवेदन दिले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**सिंधुदुर्ग जिल्ह्यातील राज्य महामार्ग क्रमांक ११५ ते गगनबावडा या रस्त्याच्या गैरसोयीबाबत**

**(४९) ७९३०६ (०६-०२-२०२४). श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिंधुदुर्ग जिल्ह्यातील, राज्य महामार्ग क्रमांक ११५, गगनबावडा येथून गगनगिरी महाराज आश्रमात जाणाऱ्या रस्त्यावर नामफलक व दिशादर्शक नसल्याने भाविकांची गैरसोय होत असल्याबाबतची तक्रार भाविकांकडून करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त रस्त्याच्या गैरसोयीबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण (१०-०६-२०२४) :** (१) हे अंशत: खरे आहे .

गगनबावडा येथुन गगनगिरी महाराज आश्रमाकडे जाणाऱ्या रस्त्यावर नामफलक व दिशादर्शक फलक दिसून येत नसल्याने भाविकांची गैरसोय होत असल्याबाबत क्षेत्रीय कार्यालयाकडे तक्रार प्राप्त झालेली नाही.
(२) प्रश्नाधीन तळेरे गगनबावडा महामार्गाचे उन्नतीकरण व दुपदरीकरणाचे काम प्रगतीत असल्यामुळे दिशादर्शक व नामफलक लावण्यास विलंब होत आहे. तथापि, कामाच्या अंदाजपत्राकामध्ये सुचना व माहिती फलक बसविण्याच्या बाबीचा समावेश आहे व त्यानुसार लवकरच फलक लावण्यात येईल.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सातारा जिल्ह्यातील सज्जनगडावर भाविक व पर्यटकांसाठी सोयीसुविधा उपलब्ध करुन देणेबाबत**

**(५०) ७९३७२ (१६-०५-२०२४). श्री.राजेश रघुनाथ पाटील (बोईसर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सातारा जिल्ह्यातील ऐतिहासिक व धार्मिक पर्यटनस्थळ असलेल्या सज्जनगडावर स्कायवॉक व लिफ्ट उभारणीसाठी केंद्रीय मार्ग निधी २०२२-२०२३ अंतर्गत दहा कोटींचा निधी केंद्र शासनाने मंजूर केलेला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त कामास सुरुवात करण्याबाबत राज्य शासनाकडून दिरंगाई होत असल्याची बाब निदर्शनास आली, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत भाविक व पर्यटकांमध्ये नाराजीची व असंतोषाची भावना निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सज्जनगडावर स्कायवॉक व लिफ्ट उभारणीच्या कामास कधीपासून सुरुवात होणार आहे व किती कालावधीत या सुविधा भाविक व पर्यटकांना उपलब्ध करुन देण्यात येणार आहे, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण (२४-०६-२०२४) :** (१) सदरचे कामास केंद्रींय मार्ग निधी योजने अंतर्गत रक्कम रु. ९८० लक्ष करिता मंजूरी प्राप्त आहे.
(२) हे खरे नाही.
(३) हे खरे नाही.
(४) सदरचे कामा करिता आवश्यक निविदा प्रक्रिया पूर्ण करुन लवकरच काम कार्यान्वयीत करणेचे नियोजन आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**जितेंद्र भोळे**
**सचिव-१ (कार्यभार),**
**महाराष्ट्र विधानसभा.**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.